बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८९८७०

साप्ताहिक http://berartimes.com
# बेरार टाईम्स
मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे




गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक १३ | बुधवार, दि.६ मार्च २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

# डॉ.आंबेडकर,पटेल,जिचकारांना पराभूत करणारा भंडारा लोकसभा मतदारसंघ




देशाच्या राजकीय पटलावर भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्र नेहमीच चर्चेत राहिला आहे. या मतदारसंघातील निवडणूक जातीय समीकरणावर लढली गेल्याने अनेक मातब्बरांना पराभव स्वीकारावा लागला. राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर,उच्च विद्याविभूषित डॉ. श्रीकांत जिचकार यांच्यासारख्या उमेदवारांना येथील मतदारांनी नाकारले. राष्ट्रीय राजकारणात वजन असलेले आणि या मतदारसंघातून ६ वेळा निवडणुक लढवून चारदा विजयी झालेले प्रफुल्ल पटेल यांनाही पराभव दाखविला. तर निवडून येणारच नाही असे सांगण्यात येणाऱ्या विद्यमान खासदार सुनिल कुकडे यांना मात्र मोदी लाटेत लोकसभेत पोचता आले.एकूणच या मतदारसंघाचा कौल कुणाच्या पारड्यात जाईल, हे तत्कालीन परिस्थितीच ठरवित असते.

**भंडारा-गोंदिया लोकसभा मतदार संघ**



खेमेंद्र कटरे
९४२३११२४३१

१९५२ च्या पहिल्या निवडणुकीत भंडारा मतदारसंघात खुल्या प्रवर्गातून एक आणि राखीव प्रवर्गातून एक असे दोन खासदार लोकसभेत गेले. यातील एका खासदाराचे निधन तर दुसरे न्यायालयात अपात्र ठरल्याने १९५४ पोटनिवडणूक घेण्यात आली. १९६२ पर्यंत दोन खासदारांची परंपरा कायम राहिली. मतदारसंघ पुनर्रचनेत बदल करून एकच खासदार लोकसभेत पाठविला जाऊ लागला. २००९मध्ये पुन्हा मतदारसंघाची पुनर्रचना झाली आणि भंडारा-गोंदिया असा मतदारसंघ अस्तित्वात आला. भंडारा जिल्ह्यातील भंडारा, तुमसर साकोली व गोंदिया जिल्ह्यातील गोंदिया, तिरोडा व अर्जुनी-मोरगाव असे एकूण सहा विधानसभा मतदारसंघ समाविष्ट आहेत. तर गोंदिया जिल्ह्यातील आमगाव विधानसभा मतदारसंघ हा गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदारसंघात गेला आहे.

भंडारा लोकसभा मतदारसंघ १९५२पासूनच काँग्रेसचा गड राहिला आहे. त्याकाळी दोन प्रतिनिधी निवडून देण्याची पद्धत असल्याने काँग्रेसचे तुलाराम चंद्रभान साखरे व चतुर्भूज विठ्ठलदास जसानी निवडून गेले. त्यानंतर १९५४ मध्ये झालेली पोटनिवडणूक देशभर चर्चिल्या गेली. कारण या पोटनिवडणुकीत खुद्द राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिंगणात होते. परंतु, या निवडणुकीत त्यांचा काँग्रेसचे भाऊराव बोरकर यांनी ८३८१ मतांनी पराभव केला. या निवडणुकीत बाबासाहेबांना पराभूत करण्यासाठी स्थानिक काँग्रेसने तसेच अशोक मेहता यांच्या प्रजा समाजवादी पार्टी ने दगाफटका केला. याच पोटनिवडणुकीत अशोक मेहता १७,१५३ मतांनी निवडून आले. जेव्हा की प्रजा समाजवादी पार्टी व शेड्युल कॉस्ट फेडरेशनमध्ये समन्वय असतांनाही बाबासाहेबांना प्रजा समाजवादी पार्टीची मते मिळाली नाही.

१९५७ च्या निवडणुकीत राम चंद्र मार्तंड हजरनवीस व आरक्षित जागेवर बालकृष्ण वासनिक निवडून आले होते. १९६२ मध्ये पुन्हा रामचंद्र हजरनवीस विजयी झाले. १९६७ च्या निवडणुकीत अशोक मेहता, १९७१ मध्ये काँग्रेसचे विश्वंभरदास दुबे विजयी झाले.

१९७७ च्या निवडणूकीत जनता पार्टीकडून लक्ष्मणराव मानकर विजयी झाले.१९८० व १९८४ मध्ये काँग्रेसचे केशवराव पारधी यांनी विजय मिळविला.त्यानंतर जनता पार्टी ही भारतीय जनता पार्टी म्हणून नावारुपास आली व १९८९ मध्ये भाजपचे डॉ. खुशाल बोपचे हे विजयी झाले. त्यानंतर १९९१, १९९६ व १९९८ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या तिकीटावर प्रफुल्ल पटेल हे सलग तिनवेळा विजयी झाले.

१९९९ मध्ये भाजपचे चुन्नीलाल ठाकूर विजयी झाले. २००४ च्या निवडणुकीत भाजपचे शिशुपाल पटले यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रफुल्ल पटेल यांचा तीन हजार मतांनी पराभव केला. त्यानंतर २००९ च्या निवडणुकीत प्रफुल पटेल यांनी भाजपचे शिशुपाल पटले यांचा पराभव केला.२०१४ च्या निवडणुकीत भाजपचे नाना पटोले यांनी राष्ट्रवादीचे प्रफुल पटेल यांचा पराभव केला.२०१८ मध्ये झालेल्या पोटनिवडणुकीत राष्ट्रवादीचे मधुकर कुकडे यांनी भाजपचे हेमंत पटले यांचा पराभव केला.तर २०१९ च्या निवडणुकीत भाजपचे सुनिल मेंढे यांनी नाना पंचबुध्दे यांचा पराभव केला होता.

राष्ट्रीय राजकारणात प्रफुल पटेल यांचा दबदबा कायम असतानाही २०१४ च्या निवडणुकीत मोदी लाटेत भाजपच्या नाना पटोले यांच्याकडून प्रफुल पटेलांना पराभव स्वीकारावा लागला. नाना पटोले खासदार म्हणून निवडून गेल्यानंतर काही दिवसातच त्यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर आरोपांची मालिका सुरू केल्याने संपूर्ण देशाचे लक्ष या मतदारसंघाकडे वळले. दरम्यान त्यांनी राजीनामा दिल्यानंतर २०१८ मध्ये पोटनिवडणूक झाली. सर्वत्र भाजपमय वातावरण असताना या पोटनिवडणुकीत नाना पटोले हे काँग्रेसमध्ये दाखल झाले व त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे मधुकर कुकडे यांच्या विजयाकरीता पुढाकार घेतला.त्या निवडणुकीत भाजपचे हेमंत पटले यांचा मधुकर कुकडे यांनी पराभव केला.आणि या मतदारसंघावर एकेकाळी राहिलेले पोवार समाजाचे वर्चस्व सकल कुणबी समाजाच्या मतांच्या गणितामुळे बिघडले गेले.

पटोलेनंतर नंतर २०१४,१०१८ व २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत कुणबी समाजाच्या उमेदवारांने विजय मिळवित या जागेवर सर्वच राजकीय पक्षात आपले स्थान पक्के केले. विजयी झाले.या मतदारसंघात उमेदवार कितीही मातब्बर असला तरी जातीच्या आधारावर येथील निवडणुका होत असतात, हेच या मतदारसंघाने दाखवून दिले आहे.पोवार,कुणबी समाजाव्यतिरिक्त तेली समाजाचे ही मोठी संख्या असून आजपर्यंत या समाजाला एकदाही कुठल्याच राजकीय पक्षाने संधी न दिल्याने यावेळी २०२४ मध्ये ब्रम्हनंद कुरंजेकर यांनी उमेदवारीकरीता दंड थोपाटले आहे.

२०२४च्या निवडणुकीसाठी जातीच्या आधारावर सर्वच पक्षात उमेदवारांचा शोध सुरू आहे.भाजपच्यावतीने कुणबी,पोवार समाजाच्या उमेदवारांच्या नावाची चर्चा आहे.तर काँग्रेस मविआतर्फे एकमेव नाना पटोलेंच्या नावावची चर्चा सुरु आहे.त्यातच या मतदारसंघात कुणबी समाज सर्वाधिक असून यात खेडुले,झाडे,बावणे व तिरेले कुणबी यांचा समावेश असून तिरेले कुणबी समाजाची संख्या मतदारसंघात खूपच कमी आहे.राजकारणात झाडे व खेडुले कुणबी समाजातील नेत्यांचे राजकीय वजन सर्वाधिक दिसून येत असले तरी यावेळी मात्र तिरेळे कुणबी समाजातून उमेदवार भाजपच्यावतीने राहण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

**गडातूनच "पंजा" गायब**

१९७५मध्ये इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी घोषित केली. त्यानंतरच्या लोकसभा निवडणुकीत या मतदारसंघातून पहिल्यांदा काँग्रेसला पराभवाचा धक्का बसला. जनसंघाचे लक्ष्मणराव मानकर हे पहिले गैरकाँग्रेसी खासदार निवडून आले. त्यावेळी मानकर यांनी राज्यात मंत्री असलेले काँग्रेसचे छेदीलाल गुप्ता यांना मात दिली होती. १९८० व १९८४ मध्ये पुन्हा काँग्रेसने केशवराव पारधी यांच्या रुपाने या मतदारसंघावर कब्जा मिळविला. पोवार समाजाला संसदेत जागा मिळवून दिली. १९८९मध्ये भंडारा लोकसभा मतदारसंघात भारतीय जनता पक्षाला ही जागा डॉ.खुशाल बोपचे यांनी मिळवून दिली. दोन वर्षातच १९९१ मध्ये पुन्हा मध्यावधी झाल्या. या निवडणुकीत प्रफुल्ल पटेल यांनी काँग्रेसच्या तिकिटावर निवडणूक जिंकली.त्यांनी भाजपचे डॉ. खुशाल बोपचे यांचा १ लाख ६३ हजार ५५८ मतांनी पराभव केला.नंतर १९९६, १९९८ मध्येही विजयी परंपरा कायम राखली.

१९९६ च्या निवडणुकीत प्रफुल पटेल यांनी भाजपचे राम आस्वले यांचा ६ हजार ९६३ मतांनी पराभव केला.१९९८ मध्ये पार पडलेल्या मध्यावधी निवडणुकीत प्रफुल पटेल यांनी भाजपचे नारायणदास सराफ यांचा १९ हजार ३०६ मतांनी पराभव केला.राजीव गांधी यांची हत्या झाली नसती तर त्यावेळी पटेलांना दारुण पराभवाला सामोरे जावे लागले असते, अशी परिस्थिती होती.उद्योगपती राहिलेल्या सराफ ांना मात्र पहिल्याच निवडणुकीत पराभव पत्करावा लागला त्यानंतर त्यांनी दुसरी कुठली निवडणुकच बघितली नाही.

१९९९मध्ये काँग्रेसचे डॉ. श्रीकांत जिचकार यांना पराभवाला सामोरे जावे लागले. त्यांचा भाजपचे चुन्नीलाल ठाकूर यांनी ३ हजार ८१९ मतांनी पराभव केला. २००४मधील निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने काँग्रेससोबत आघाडी करून भंडारा लोकसभा मतदारसंघ आपल्या ताब्यात घेतला. तेव्हापासून या मतदारसंघातून काँग्रेसचा पंजा लोकसभा निवडणुकीतून गायब झाला. आजही पंजा आपले अस्तित्व शोधत आहे,ते केवळ पटेल यांच्यामुळेच.

२००४ च्या निवडणुकीत भाजपचे शिशुपाल पटले यांनी प्रफुल पटेल यांचा ३ हजार ९ मतांनी पराभव केला होता. वास्तविक भाजपने नवखा उमेदवार म्हणूनच शिशुपाल पटलेंना उमेदवारी दिली होती. त्यानंतर २००९ च्या लोकसभा निवडणुकीत पुन्हा भाजपने शिशुपाल पटले यांना उमेदवारी दिली. परंतु, काँग्रेसचे बंडखोर नाना पटोले यांनी दुसऱ्या क्रमांकाची मते घेतल्याने भाजपच्या शिशुपाल पटलेंची अनामत रक्कम जप्त झाली.

यावेळी भाजपच्या अनेक नेत्यांनी छुप्या पध्दतीने पटेल व पटोलेंचा काम केला होता.काँग्रेसच्या बंडखोर उमेदवारामुळे पुन्हा प्रफुल पटेल यांचा २ लाख मतांनी विजय झाला.तर २०१४ च्या निवडणुकीत भाजपकडून नाना पटोले रिंगणात राहिल्याने प्रफुल पटेलांना अडीचलाखाहून अधिक मतांनी पराभवाचा स्वाद चाखावा लागला होता.या निवडणुकीत कुणबी समाजासह इतर समाजाने पटोलेंच्या बाजुने कौल दिला.

त्यानंतर २०१८ मध्ये नाना पटोलेंनी आपल्या खासदारकीचा राजीनामा दिल्यामुळे मे २०१८ मध्ये झालेल्या पोटनिवडणुकीत राँकाकडून मधुकर कुकडे हे रिंगणात राहिले त्यांनी भाजपच्या हेमंत पटले यांचा ५० हजाराने पराभव केला. यानिवडणुकीत दुसऱ्यांदा कुणबी समाजाने आपल्या एकतेचा व शक्तीचा परिचय करुन देत कुकडे यांना लोकसभेत पोचवले.त्यानंतर २०१९ मध्ये झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीक भारतीय जनता पक्षाच्यावतीने आरएसएसचे कार्यकर्ते व व्यवसायाने कंत्राटदार असलेल्या सुनिल मेंढे यांना उमेदवारी दिली.त्यावेळी सुध्दा भाजपमध्ये उमेदवारीकरीता चागलीच चुरस निर्माण झाली होती.२०१९ मध्ये सुध्दा बाहेरचा नको जी भूमिका होती तीच भूमिका भाजपमध्ये २०२४च्या निवडणुकीतही दिसून येत आहे.१९ च्या लोकसभा निवडणुकीत मेंढे यांनी मोदी लाटेत प्रचंड मतानी विजय प्राप्त करुन राष्ट्रवादी काँग्रेसच्या नाना पंचबुध्दे यांचा पराभव केला होता.गेल्या तीन लोकसभा निवडणुकांचा विचार केल्यास बहुजन समाज पक्षाचा उमेदवार हा ५० हजाराच्यावर मतदान घेऊन आपली तिसरी ताकद निर्माण करण्यात यशस्वी झाला असला तरी मतदारसंघात पाहिजे तसे यश बसप मिळवून शकले नाही,याउलट कुठल्या एका उमेदवाराच्या पराभवाकरीता ते प्रभावी ठरले आहेत.आता २०२४ च्या निवडणुकीत कोण कुठल्या पक्षाचा उमेदवार राहतो यावरच सर्वांचे लक्ष लागले आहे.

## -: गाजलेल्या निवडणुका :-

**१९५४ झालेल्या पोटनिवडणुकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पराभव भाऊराव बोरकर यांनी केला. झाला.**

**१९९९मध्ये डॉ. श्रीकांत जिचकार यांच्या उमेदवारीमुळे पुन्हा या मतदारसंघाकडे राजकीय धुरीणांच्या नजरा खिळल्या. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष उदयास आला होता. प्रफुल्ल पटेल हे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेले. परंतु, त्यांनी निवडणूक न लढता जगदीश निंबार्ते यांना राष्ट्रवादीची उमेदवारी दिली. भाजपकडून चुन्नीलाल ठाकूर तर काँग्रेसकडून डॉ. श्रीकांत जिचकार रिंगणात होते. या अटीतटीच्या लढतीत भाजपचे चुन्नीलाल ठाकूर यांनी विजय मिळविला. डॉ. जिचकार यांचा ३ हजार ८०० मतांनी पराभव झाला. प्रतिभावान व्यक्तिमत्व म्हणून डॉ. जिचकार यांची ओळख असताना त्यांनाही येथील मतदारांनी नाकारले होते.याकरीता काही तत्त्कालीन राजकीय घडामोडी सुध्दा तेवढ्याच महत्वाच्या ठरल्या होत्या.मात्र त्याकडे दुर्लक्ष करुन ठाकूर जिचकार लढाईला जातीय रंग देण्याचा प्रयत्न झाला.**

**नाना पटोले यांच्या राजीनाम्याने रिक्त झालेल्या या जागेसाठी मे २०१८मध्ये पोटनिवडणूक घेण्यात आली. ही निवडणूक जिंकण्यासाठी भाजपने सर्वतोपरी प्रयत्न केले. परंतु, राष्ट्रवादी काँग्रेसचे मधुकर कुकडे यांनी नाना पटोलेंच्या बळावर भाजपचे हेमंत पटले यांचा पराभव केला.**



डॉ. बाबासाहेब आंबेडकर | डॉ. श्रीकांत जिचकार | प्रफुल्ल पटेल

### विधानसभेची स्थिती

- भंडारा : अपक्ष
- तुमसर : राकाँपा
- साकोली : काँग्रेस
- तिरोडा : भाजप
- अर्जुनी मोरगाव : राकाँपा
- गोंदिया : अपक्ष

### मतघटक

कुणबी
तेली
पोवार
अनु.जाती
माळी, मरार

### लोकसभा क्षेत्रातील खासदार

- १९५२ : तुलाराम साखरे, चतुर्भूज जसानी (काँग्रेस)
- १९५४ : भाऊराव बोरकर,(काँग्रेस), अशोक मेहता (प्रजा पार्टी)
- १९५७ : रामचंद्र हाजरनवीस, बालकृष्ण वासनिक (काँग्रेस)
- १९६२ : रामचंद्र हाजरनवीस (काँग्रेस)
- १९६७ : अशोक मेहता (काँग्रेस)
- १९७१ : विश्वंभरदास दुबे (काँग्रेस)
- १९७७ : लक्ष्मणराव मानकर (जनता पार्टी)
- १९८० : केशवराव पारधी (काँग्रेस)
- १९८४ : केशवराव पारधी (काँग्रेस)
- १९८९ : डॉ.खुशाल बोपचे (भाजप)
- १९९१ : प्रफुल्ल पटेल (काँग्रेस)
- १९९६ : प्रफुल्ल पटेल (काँग्रेस)
- १९९८ : प्रफुल्ल पटेल (काँग्रेस)
- १९९९: चुन्नीलाल ठाकूर (भाजप)
- २००४ : शिशुपाल पटले (भाजप)
- २००९ : प्रफुल्ल पटेल (राष्ट्रवादी काँग्रेस)
- २०१४ : नाना पटोले (भाजप)
- २०१८ : मधुकर कुकडे (राष्ट्रवादी काँग्रेस)
- २०१९ :सुनिल मेंढे(भाजप)

## राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्ता व शेतकरी मेळावा गुरुवारला सडक अर्जुनीत

### उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, खा.प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष तटकरे व पालकमंत्री आत्राम यांची उपस्थिती



**गोंदिया:** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने गोंदिया-भंडारा जिल्ह्याचा कार्यकर्ता व शेतकरी मेळावा सडक अर्जुनी येथे ७ मार्च रोजी आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याला राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते खा.प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे व जिल्ह्याचे पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम उपस्थित राहून संबोधित करणार आहेत. यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने जय्यत तयारी सुरु आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने सडक अर्जुनी येथे गोंदिया व भंडारा या दोन्ही जिल्ह्याचा संयुक्त कार्यकर्ता व शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते खा. प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे व जिल्ह्याचे पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम उपस्थित राहणार आहेत. या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांची बैठक घेण्यात आली. दरम्यान मेळाव्यात जास्तीत जास्त संख्येने तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्ता तसेच शेतकऱ्यांनी उपस्थित रहावे. मेळाव्याच्या यशस्वितेसाठी योग्य ते नियोजन करावे, अशा सुचना देण्यात आल्या आहेत.

या बैठकीत विनोद हरिणखेडे, कुंदन कटारे,पूजा अखिलेश सेठ, केतन तुरकर,रजनी गौतम, किर्ती पटले, गणेश बरडे, घनश्याम मस्करे, सरला चिखलोंडे, रविकुमार पटले, सरला चिखलोंडे, अखिलेश सेठ, रविकुमार पटले, शिवलाल जमरे, शंकरलाल टेंभरे,राजू एन जैन, चंदन गजभिये,विजय रहांगडाले, पदमलाल चौरिवार,टी.एम.पटले, चंद्रकुमार चव्हाण,करण टेकाम, चंद्रकुमार चुटे,जितेंद्र बिसेन, कैलास नागपुरे,केवल रहांगडाले, रमेश रहांगडाले,नितीन टेंभरे, उपस्थित होते.

## आयत्या बिळात...!महायुतीत स्थानिकांना डावलण्याचा कुटील डाव?

**गोंदिया:** देशात सध्या लोकसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत. गोंदिया-भंडारा जिल्हा मतदार संघ सुद्धा त्याला अपवाद नाही. मात्र, या दोन्ही जिल्हातील महायुतीच्या वाटचालीकडे लक्ष दिल्यास सध्या "आयत्या बिळात...' या म्हणीची प्रचिती येत आहे. गेल्या काही दिवसांपासून उमेदवारी मिळविण्याच्या नादात बाह्यशक्ती अधिक सक्रीय असून स्थानिक नेत्यांना कार्यशून्य सिद्ध करण्याचा केविलवाणा प्रकार जोरात सुरूआहे, हे अर्जूनी मोरगाव तालुक्यातील झाशीनगर उपसा सिंचन योजनेच्या श्रेयवादावरुन समोर आले आहे.

अर्जुनी मोरगाव तालुक्यातील झाशीनगर उपसा सिंचन योजनेच्या श्रेयाचे राजकारण सध्या जिल्ह्यात जोमात सुरु झाले आहे. आपल्यामुळेच ही योजना सुरु होत असल्याचे काही नेत्यांच्या माध्यमातून सांगितले जात आहे. १९९६ मध्ये अस्तित्वात आलेल्या या योजनेला पूर्ण होण्यासाठी तब्बल २७ वर्षे लागली. तरीही योजना साकारण्यात श्रेय लाटणा-यांचे योगदान किती? हा सुध्दा प्रश्न अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघातसहसंपूर्ण गोंदिया जिल्ह्यात चर्चिला जात आहे.

वास्तविक, पहिल्या टप्प्यात या योजनेचे पाणी नवेगावबांधच्या जलाशयात सोडण्याचे होते,ते २९ मे २३ रोजीच पूर्ण झाले. टप्पा २ करीता ज्या वनविभागाच्या अडचणी आलेल्या होत्या, त्या अडचणीसंदर्भातील प्रस्तावावर जिल्हाधिकारी कार्यालयाच्यावतीने महिन्याआधीच निर्णय घेतले गेले. याचा फायदा लाटून हे कार्य आपणच करतोय, हा देखावा तयार करण्यात येत आहे. यावरून गोंदिया-भंडारा मतदारसंघातील आजी व माजी लोकप्रतिनिधीअकार्यक्षम होते काय? असे प्रश्नचिन्ह या श्रेयवादातून निर्माण झाले आहे.

वास्तविक, येत्या महिन्यात १८ व्या लोकसभेकरीता निवडणुकीची आचारसंहिता लागू होणार असल्याने काही इच्छुक उमेदवार जे लोकप्रतिनिधी राहिलेत त्यांनी सध्या भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघातील कुठलीही योजना असो की अवकाळी मदत ते बोनसपर्यंत सर्व आपल्यामुळेच मिळत असल्याचा कांगावा केला जात आहे. यामुळे मतदारसंघातील विद्यमान लोकप्रतिनिधींचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

लोकसभा मतदारसंघाचा विचार केल्यास भाजप-सेना-राष्ट्रवादी या सध्याच्या महायुतीमध्ये साकोली व आमगाव देवरी हे दोन मतदारसंघ सोडता महायुतीच्याच लोकप्रतिनिधींचा ताबा आहे. खासदारही महायुतीचेच असताना विद्यमान लोकप्रतिनिधींचा दबाव सरकार दरबारी कमी आणि माजी लोकप्रतिनिधीचा दबाव अधिक आहे की दाखवण्याचा प्रयत्न केला जातोय, हे अर्जुनी मोरगाव तालुक्यातील झाशीनगर उपसा सिंचन योजनेच्या निमित्ताच्या चर्चेवरून समोर आले आहे.

ज्या अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघात झाशीनगर उपसा सिंचन योजना अस्तित्वात आली, त्या मतदारसंघाचे नेतृत्व स्व.दयाराम कापगते, नाना पटोले, इंजि.राजकुमार बडोले यांनी केले आहे. सध्या मनोहर चंद्रिकापूरे हे त्या मतदारसंघाचे विद्यमान आमदार आहेत. स्व.कापगते यांच्या कार्यकाळात ही योजना तत्कालिन मंत्री व जिल्ह्याचे तत्कालीन पालकमंत्री प्रा.महादेवराव शिवणकर यांच्या पुढाकाराने साकारली गेली. तेव्हा या प्रकल्पाची किंमत ४५ कोटी होती. हा प्रकल्प सन २००७ ला पूर्ण करण्याचे नियोजन होते. आता ही ४५ कोटींची योजना तब्बल १६८ कोटींवर पोहचली.

विशेष म्हणजे शेतक-यांसाठी वरदान ठरणा-या ईटियाडोह धरणावर तयार करण्यात आलेल्या झाशीनगर उपसा सिंचन योजनेचे पाणी तब्बल २७ वर्षाच्या प्रदीर्घ कालावधीनंतर जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्ष व विद्यमान जि.प.सदस्य रचनाताई गहाणे यांच्या पुढाकारामुळे नवेगावबांध जलाशयात २९मे २०२३ रोजी पहिल्यांदा पडले आणि योजना खऱ्या अर्थाने कार्यान्वित झाली. तत्कालिन सामाजिक न्याय व विशेष साहाय्यमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री इंजि. राजकुमार बडोले यांनी आपल्या काळात योजना सुरु व्हावी, यासाठी प्रयत्न करुन मोठ्या प्रमाणात निधीची व्यवस्था केली होती. त्यातच काम करणारी यंत्रणेने हे काम कासवगतीने करुन फार उशीर केला.

ही योजना तत्काळ सुरु व्हावी व नवेगावबांध जलाशयात पाणी पडावे म्हणुन नवेगावबांध क्षेत्राच्या जिल्हा परिषद सदस्या रचनाताई गहाणे यांनी सतत पाठपुरावा केला. एवढेच नव्हे तर यासाठी जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत जिल्हास्तरीय समितीसुध्दा गठीत करण्याची मागणी केली होती. त्यामुळे जि.प.च्या सदस्य सचिव जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शितल पुंड यांनी १८ ऑगस्ट २०२२ ला समिती गठित केली होती. त्या समितीच्या पाठपुराव्यामुळे या योजनेच्या कामाला गती मिळाली.

सन २०२३ च्या मे महिन्यात पहिल्यांदा या योजनेचे पाणी नवेगावबांधच्या जलाशयात पडले. त्यानंतर टप्पा २ च्या कामाला सुरवात झाली असतानाचा कंत्राटदाराने पुन्हा योजनेच्या कार्याकडे दुर्लक्ष केल्याने व वनविभागाच्या रखडलेल्या काही त्रुट्यामुळे रखडलेले कामही गेल्या जानेवारी-फेब्रुवारी महिन्यातच मार्गी लागलेले असताना आपल्यामुळेच शेतात पाणी पडणार हे कशासाठी सांगत दुसऱ्याच्या टाळूवरचे लोणी खाण्याचा केविलवाणा प्रकार सध्या केला जात असल्याने स्थानिकांना डावलण्याचा कुटील डाव खेळला जात आहे.

## जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेत ६६६ कोटींचे सामंजस्य करार



**गोंदिया,** जिल्ह्यात उद्योग क्षेत्रात गुंतवणुकीला चालना देण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्रातर्फे जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद घेण्यात आली. जिल्हाधिकारी प्रजित नायर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या परिषदेत ०९ उद्योग घटकांसाठी ६६६.५० कोटींचे सामंजस्य करार झाले. यातून जिल्ह्यातील बेरोजगार युवकांना रोजगार मिळण्यास संधी उपलब्ध होणार असून उद्योग उभारतांना जिद्द, परिश्रम व चिकाटी कायम असू द्यावे असे जिल्हाधिकारी प्रजित नायर म्हणाले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेचे आयोजन करण्यात आल होते,त्यावेळी ते बोलत होते.एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष हुकूमचंद अग्रवाल,राईस मिल असोसिएशनचे अध्यक्ष अशोक अग्रवाल,लाख उद्योग असोसिएशनचे अध्यक्ष गजानन अग्रवाल,एमआयडीसीचे उपअभियंता श्री.हारगुळे,सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्यवस्थापक चन्ने,जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक भुनेश्वर शिवणकर उपस्थित होते.

जिल्ह्याचे राज्याच्या एकूण उत्पन्नामधील योगदान हे केवळ ०.७ टक्के एवढाच आहे.आपण २०२७-२८ पर्यंत हाच हिस्सा १.३ टक्क्यावर नेण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.यावेळी जिल्ह्यातील विविध उद्योगाबाबत सामंजस्य करार उद्योग कंपन्यांशी करण्यात आले. त्यामध्ये सुफलाम इंडस्ट्रीज लिमिटेड (३३५ कोटी),गाव माझा उद्योग फाऊंडेशन(३०० कोटी),लोया प्री-इंजिनियरींग बिल्डींग प्रायव्हेट लिमिटेड (१२ कोटी),इंडियन ॲक्वा(०.५ कोटी),श्री कान्हा एग्रो इंडस्ट्रीज(५.१६कोटी),पार्वती फुडस एन्ड फीड्स (४.३३कोटी),स्कुब डायग्नॉस्टीक सेंटर(५ कोटी),मिनाझ अल्ताफ हमीद इंडस्ट्री (२.० कोटी),अलताफ अकबर अली हमीद इंडस्ट्री (२.५० कोटी) यांच्याशी एकूण ६६६.५० कोटींचा सामंजस्य करार करण्यात आला.यावेळी जिल्हाधिकारी प्रजित नायर यांच्या हस्ते उद्योजकांना सामंजस्य करारपत्र प्रदान करण्यात आले.

## संपादकीय

# कुटुंबाला भोवते आहे वैचारिक दारिद्र्य

समुपदेशनाच्या अनेक प्रकारच्या केसेस सोडवताना, स्त्री, पुरुष, मुलं, कुटुंबातील अन्य व्यक्ती यांच्याशी सखोल चर्चा करताना काही बाबी प्रकर्षाने जाणवतात. केसच्या आनुषंगाने पती – पत्नी, मुले यांच्याशी तर बोलावे लागतेच पण त्याही पलीकडे जावून जेव्हा आपण त्यांनी सांगितलेल्या माहितीच्या आधारे, त्यांना होत असलेला घरातील इतर व्यक्तींचा त्रास लक्षात घेऊन, त्यांच्या घरातील इतर नातेवाईक अथवा लोकांशी चर्चा करतो तेव्हा लक्षात येते की, कुटुंब विस्कळीत व्हायला कारणीभूत ठरते ती घरातील लोकांची कमकुवत विचार शैली, उथळ स्वभाव, अर्धवट ज्ञान, इतरांबद्दल मत बनविण्याची घाई, अति राग, अति द्वेष, मत्सर, जळाऊ वृत्ती, तिरस्कार आणि सतत आपापसात केलेली तुलना. स्वतःच्या अनुभवातून मत बनवणे, निर्णय घेणे, परिस्थितीचा सर्वांगीण अभ्यास करणे, दुसऱ्याचे ऐकून घ्यायला कमीपणा वाटणे, वास्तवापेक्षा ऐकिव माहितीवर पटकन विश्वास ठेवून खोट्या चुकीच्या वृत्तींना अधिक फोफावण्यासाठी खतपाणी घालणे.

सून नांदायला येत नाही, अशी तक्रार घेऊन जेव्हा सासू, नणंद अथवा नवरा येतो तेव्हा तिच्या अगणित चुकांचा पाढा वाचून दाखवला जातो. तिच्यामध्ये अनेक खोड्या काढून ती कशी आणि किती वाईट आहे हे सगळे सांगितले जाते. मग सून जर इतकी वाईट आहे हे तुम्ही स्वतः सांगताय, ठरवताय तर तुम्हाला ती परत नांदायला कशाला हवी आहे? परत तिला का बोलवायचे आहे? यालाच आपण वैचारिक दिवाळखोरी म्हणू शकतो. ज्या केसमध्ये पत्नी नवऱ्याची तक्रार सांगते त्यावेळी त्याचे सर्व अवगुणच सांगते. त्याच्यापासून होणारा त्रासच सांगते. त्याच्यात एकही चांगला गुण नसेल का की तो तुम्ही अभिमानाने सांगू शकता? मग असा इतका दुर्गुणी माणूस तुम्ही नवरा म्हणून का निवडला? की लग्न झाल्यावर तो इतका नालायक सिद्ध झाला?

कौटुंबिक समस्या सोडवताना प्रकर्षाने जाणवणारा मुद्दा असतो घरातील लोकांनी एकमेकांना माघारी बोलणे आणि त्यातून निर्माण झालेला प्रचंड मोठा वैचारिक गुंता. आपण केस संदर्भात काहीही माहिती विचारल्यास लोकांची उत्तरे असतात तो म्हणत होता, ती सांगत होती, यांच्याकडून समजले, हा बोलला, तो बोलला, माझ्या कानावर आले. लोकांकडे फक्त ऐकीव डाटा उपलब्ध असतो हा डाटा खरा किती, खोटा किती याबद्दल त्यांना स्वतःलाच माहीत नसते. ऐकीव माहितीच्या आधारित सर्व अवलोकन केलेले असते. बरं तो डाटा म्हणजेच माहिती पण सुसंगत सुसूत्र असते असे नाही तर ती दहा ठिकाणावरुन मिळालेली असते.

घरातीलच लोकांकडे एकमेकांबद्दल असलेल्या कोणत्याही माहितीला काहीही सबळ पुरावा, काही ठोस पार्श्वभूमी नसते, कोणत्याही वाक्याला गांभीर्य नसते. घरातील अत्यंत महत्त्वाच्या, संवेदनशील, तातडीच्या, भविष्यात त्रासदायक ठरणाऱ्या विषयावर काय कशी भूमिका घेणे योग्य राहील याबद्दल थोडा सुद्धा विचार कोणीही केलेला नसतो. घरातील आर्थिक व्यवहार, आर्थिक जबाबदाऱ्या, मुलांचे भवितव्य, आजारपण, घरातील लोकांची आर्थिक बचत यांमध्ये कुठलेही गांभीर्य नसते. त्यामुळे कोणतीही आर्थिक समस्या उभी राहिल्यावर एकमेकांना दोष देणे, हात वर करणे असे प्रकार घडतात.

एकमेकांबद्दल बोलणे, दोष देणे, आरोप करणे, कोणाची बदनामी करणे यात पूर्ण आयुष्य गेलेली व्यक्ती उतार वयात सुद्धा बदललेली नसते हे पाहून सुद्धा आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही. अनेक ज्येष्ठ, साठी ओलांडलेले लोक सुद्धा बिनबुडाचे विधान करताना दिसतात. स्वतःच्या चुकांना स्वीकारताना त्यांना कमीपणा वाटतो. एकाच घरातील लोक एकमेकांना किती खालच्या दर्जाचे बोलू शकतात, कसे अपशब्द वापरू शकतात, घरातच लोकांना आपापसात आदर नाही हे पाहिल्यावर जाणवते की यांना अजून आयुष्याची संकल्पनाच समजली नाही. आपल्याच माणसांबद्दल जर आपणच इतके पातळी सोडून बोललो आणि वागलो तर आपले शिक्षण, संस्कार, सुसंस्कृतपणा, पैसा, श्रीमंती आणि बडेजाव सगळे व्यर्थ आहे हेच लोकांना समजत नाही.

अनेक सुशिक्षित कुटुंबे अनेक कारणांनी उद्ध्वस्त होताना आपण बघतोय. कोणाचा कोणाशी ताळमेळ नसल्यासारखे, कोणालाच कोणाची किंमत नसल्याने, फक्त स्वतःला कसा त्रास होणार नाही हे पाहून अनेकजण चालत असतात. कुटुंबात कितीही गंभीर, बिकट समस्या असली तरी मी कसा बरोब्बर आहे, माझ्यामुळे काहीच घडलेले नाही, माझा काहीच संबंध नाही हे पटवून देण्याचा प्रयत्न करतात. स्वतःची बाजू सुरक्षित करण्यात, अलिप्त राहण्यात जर तुम्हाला धन्यता मानायची असेल, तर अशा लोकांनी कोणाबद्दल काहीच मत मांडणे योग्य नाही. तटस्थ भूमिका घ्यायची असेल, तर एकदमच शांत आणि गप्प राहणे अपेक्षित आहे. समस्या अंगावर घ्यायची नाही, समस्या सोडवायची नाही मग त्याबद्दल स्वतःचे ज्ञान का पाजळावे? हे लोकांना कळत नाही.

अनेक जण तर सोईनुसार नाती बदलतात. एखाद्या नव?्याने चांगले काही केले तर बहिणी म्हणतात आमचा भाऊ! त्याने काही चूक केली की सुनेला म्हणणार तुझा नवरा, तुला ताब्यात ठेवता आला नाही का? बाईची काही चूक झाली तर तिच्या सासरचे तसेच आहेत म्हणून ती तशी वागली असे बोलून माहेरचे मोकळे होतात. घरातील लहान मुलांना पण यात सोडे जात नाही. मुले कुठे चुकली की आईचे वळण, आईचे संस्कार असे बोलून बाप मोकळा होणार, त्याच मुलाने काही यश मिळवले तर मग मुलगा कोणाचा आहे शेवटी! असे बोलून बाप श्रेय लाटणार. सासू-सुनांच्या बाबतीत तर आजही तोच पारंपरिक सासुरवास नित्यनियमाने सुरू असल्याचे दिसते. सून कितीही सुशिक्षित, कामावणारी असली तरी आज देखील सुनेबद्दल केल्या जाणा?्या तक्रारी काही कमी होताना दिसत नाहीत. लग्नाला १५-२० वर्षे झाल्यावरही नणंद – भावजय यांच्यामध्ये सुसंवाद आणि विचारविनिमय याचा अभाव जाणवतोय. एकमेकींचा पाणउतारा करण्यापेक्षा आपण एकमेकींच्या आयुष्यातील कमतरता कशा भरुन काढू, आपले घर पुढे कस नेऊ, आपल्या गुणांचा वापर करुन घराला हातभार कसा लावता येईल यावर कोणीच बोलत नाही.

ङ्गजा मुली जा दिल्या घरी सुखी राहाफ हा प्रत्येक मुलीला आईकडून दिला जाणारा मूलमंत्र आता काहीही झाले की, ताबडतोब पोलीस स्टेशनला जा या सल्ल्यात रुपांतरित झालेला दिसतो. अनेक कुटुंबातील वैचारिक दारिद्र्य इतकं विकोपाला गेलं आहे की प्रॉपटी, पैसा, वाटणी, हिस्सा यासाठी सर्व नातेसंबंध पायदळी तुडवले गेले आहेत. समुपदेशनला कोणत्याही स्वरुपाचा वाद आला की त्यामध्ये पैसा इस्टेट प्रॉपर्टी हा अग्रणीचा मुद्दा पुढे रेटला जातो. घरातली माणसे, त्यांच्यातील प्रेम, जिव्हाळा हा फक्त एकत्र फोटो काढून सामाजिक माध्यमात टाकण्याइतपत शिल्लक आहे असे वाटते.

आजमितीला समाजाची तसेच अनेक कुटुंबांची जी विदारक परिस्थिती झालेली आहे, विभक्त कुटुंब, घटस्फोट, विवाहबाह्यसंबंध, आत्महत्या, घात-पात, अपमृत्यू, ताण- तणावातून उद्भवणारे आजारपण, मानसिक आजरांचे वाढते स्वरुप, अपघात, व्यसनाधीनता, मुला-मुलींनी दिशाहीन होणे या सगळ्या गोष्टीना कारणीभूत घराघरातील मतभेद, वैचारिक दारिद्र्य, योग्य वेळी योग्य निर्णयशक्ती वापरण्याचा अभाव, कुटुंबाला एकत्रित ठेवण्यासाठी अपेक्षित असलेल्या दमदार नेतृत्वाचा आभाव. त्यामुळे या सगळ्याचा सर्वांगीण विचार करुन आपण आपली संस्कृतीी, आपले कुटुंबं कसं जपायचं हे आता फक्त आपल्याच हातात आहे.

**मीनाक्षी जगदाळे**

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# शिक्षणाला अग्रक्रम हवा

**सप्रेम नमस्कार,**

मी गेली ५० वर्षे गंभीर स्वरुपाच लेखन करीत आलो आहे. त्यापेक्षाही जास्त काळ मी शाळा, महाविद्यालयांतून अध्यापन करण्यात अथवा अन्य मार्गानी प्रबोधन करण्यात व्यतीत केलेला आहे. स्वाभाविकच, माझ्या दृष्टीनं शिक्षण हा प्रत्येक व्यक्तीचा आणि एकूण समाजाचाही अग्रक्रमाचा विषय असायला हवा असं मला वाटतं, शिक्षणाचं हे महत्त्व ध्यानात घेऊनच आधुनिक काळात महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगे महाराज, डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील आणि शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे यांनी आपल्या संपूर्ण आयुष्याचा एक महत्त्वाचा घटक म्हणून शिक्षणाकडं पाहिलं आहे. यांच्यापैकी काही व्यक्तींनी तर शिक्षण हेच आपल्या आयुष्याचं एकमेव व्रत मानले. त्याचा लाभ कोट्यवधी व्यक्तींना आणि कुटुंबांना झाला आहे. आपली मुलं आणि मुलीही उत्तम शिक्षण घेऊन जगाच्या कानाकोपऱ्यांत आपलं कर्तृत्व गाजवू लागली आहेत.

एका बाजूनं ही अतिशय स्वागतार्ह आणि अभिनंदनीय बाब असली, तरी आपल्याला दुसऱ्या एका बाजूचा विचार केला पाहिजे. कोणत्याही क्षेत्रात मोजक्या व्यक्तींनी अत्युच्च शिखरं पादाक्रांत केली, तर ती गोष्ट कौतुकाचीच आहे; पण बाकीचा बहुसंख्य समाज हा जर उत्तम दर्जाच्या शिक्षणाला मुकत असेल, तर ती कोणत्याही समाजाच्या दृष्टीने अभिमानाची बाब नव्हे.

सर्वसामान्य, अगदी गोरगरीब, कष्ट करणाऱ्या, हातावरचे पोट असणाऱ्या,रोज कमावलं तर खाता येईल, अशी स्थिती असलेल्या कुटुंबांतील मुलामुलामध्येही उच्च कोटीची प्रतिभा, बुद्धिमत्ता आणि गुणवत्ता असते; पण केवळ प्रतिकूल परिस्थितीमुळं जर त्यांना शिक्षण आणि त्यातही दर्जेदार शिक्षण मिळाले नाही, तर लहान वयातच त्यांच्या प्रतिभेचे अंकुर खुडले जातात.. त्यांचा विकास कुंठित होतो. दारिद्र्य त्यांच्या गुणवत्तेला फुलूच देत नाही. ही केवळ त्या व्यक्तीची आणि त्या कुटुंबाची हानी नसते, तर ती आपल्या संपूर्ण समाजाची, राष्ट्राची आणि एकूण मानवजातीची ही फार मोठी हानी असते. त्यांची बौद्धिक क्षमता पूर्णपणे फुलून येणारे शिक्षण त्यांना मिळालं, तर त्यांच्या कर्तृत्वात जमीन अस्मानाचा फरक पडू शकतो, संपूर्ण समाजाला समृद्ध होण्यासाठी या घटनेचा लाभ होऊ शकतो. आपल्याला हवे असलेले वेगवेगळ्या क्षेत्रांतील उत्तम दर्जाचे तज्ज्ञ त्यामुळ आपल्याला मिळू शकतात. गेल्या दीड-पावणेदोनशे वर्षांत आपण हे परिवर्तन मोठ्या प्रमाणात पाहिलं आहे. ज्यांच्या आधीच्या कित्येक पिढ्या निरक्षर होत्या, त्यांची मुलं आणि नातवंडं आता आकाशाला भिडण्याइतकी उत्तुंग झेप घेऊ लागली आहेत. म्हणूनच आपल्याला शिक्षणाच्या बाबतीत अतिशय गांभीर्यानं विचार करण्याची गरज आहे. उत्तम दर्जाच्या शिक्षणामुळंच आपल्या पुढच्या सर्व समस्या सहजतेनं सोडविण्याचं सामर्थ्य आपल्या समाजात निर्माण होईल, असं मला वाटतं.

उच्च दर्जाचे शिक्षण मिळाले. त्यामुळे उत्तम संधी मिळाल्या.महत्त्वाच्या पदांवर जाता आले. संपत्ती, प्रतिष्ठा मिळाली, ही गोष्ट चांगलीच आहे; पण त्याबरोबरच किमान दोन पथ्ये पाळणे अत्यावश्यक आहे. पहिली गोष्ट म्हणजे आपल्याला मिळालेले शिक्षण केवळ आपल्या गुणवत्तेमुळे आणि कर्तृत्वामुळे मिळाले आहे, त्याचे श्रेय दुसऱ्या कुणाला नाही, अशा समजुतीत राहता कामा नये. आपल्या कर्तृत्वाचे काही श्रेय आपण जरुर घ्यावे; पण त्याबरोबरच आधीच्या काही महामानवांनी आपले आयुष्य खची घालून आपल्याला शिक्षणाच्या संधी प्राप्त करुन दिल्या आहेत, हे विसरता कामा नये..

आपल्या शिक्षणाचा लाभ योग्य त्या स्वरुपात स्वतःला जरुर घ्यावा; पण निदान थोडं तरी मागं वळून पाहणं हे आवश्यक आहे. आपली जी भावंडं या संधींना मुकलेली आहेत, वंचित राहिलेली आहेत. त्यांना चांगल्या संधी प्राप्त कन देण्यासाठी आपण कोणत्या ना कोणत्या मार्गानं त्यांना मदतीचा हात दिला पाहिजे, मी या भावंडांची संकल्पना केवळ कौटुंबिक दृष्टीने पाहत नाही, तर सामाजिक दृष्टीनं पाहतोय. समाजातील जे लोक अडीअडचणीत असतील तर त्यांच्या मुला मुलीपर्यंत विविध प्रकारच्या संधी पोचवण्यासाठी आपण आपल्या ज्ञानाचा उपयोग केला पाहिजे. मग तो उच्च दर्जाचे संशोधन करण्याच्या मार्गाने असो, शिक्षण पद्धतीमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने असो अथवा समाजापुढच्या कठीण समस्या सोडवण्याच्या दृष्टीने असो.

एका बाजूनं शिक्षणाचा असा विधायक उपयोग करत असताना दुसऱ्या बाजूनं आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजातील कोणत्याही घटकाला विघातक वा विध्वंसक होता कामा नये. याचीही काळजी घेतली पाहिजे. आपण प्राप्त केलेल्या ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान यांचा आपल्याकडून दुरुपयोग होता कामा नये. यासंदर्भात मला अतिशय क्लेशकारक वाटत आलेले एक उदाहरण आवर्जून सांगतो. १९८९ मध्ये माझे हिंदू संस्कृती आणि स्त्री हे पुस्तक प्रकाशित झाले. ...त्यांच्या मनोगतात. मी मला वाटणारी एक काळजी मांडली होती. एक हजार पुरुषांच्या मार्ग ९३०. स्त्रिया असं प्रमाण त्या काळात सातत्यानं समोर येत होते. हा स्त्री-पुरुष संख्येच्या प्रमाणातील ढळलेला समतोल तेव्हा अतिशय चिंतेचा वाटला होता; पण अतिशय खेदाची गोष्ट अशी, की त्यानंतर परिस्थिती ढासळतच गेली आणि अलीकडे तर काही ठिकाणी एक हजार पुरुषांच्या मागे आठशेपेक्षाही कमी स्त्रिया अशी स्थिती झाली असल्याच्या बातम्या येऊ लागल्या आहेत. याचे किती दुष्परिणाम होतोल, त्याची कल्पना केली, तरी छातीत धडकी भरते. जे गोरगरीब, निरक्षर, विज्ञान, तंत्रज्ञान प्राप्त करण्याची संधी न मिळालेले लोक हे करतात, त्यांना मो फारसा दोष देणार नाही. याबाबतीत मला जे सर्वांत मोठे गुन्हेगार वाटतात, ते व्यक्तिगत लोभापायी आपल्याला प्राप्त विज्ञान, तंत्रज्ञानाचा दुरुपयोग, करुन सर्वसामान्य लोकांना स्त्रीभ्रूणहत्या करण्यास प्रवृत्त करतात. प्राप्त झालेल्या विज्ञान तंत्रज्ञानाच्या दुरुपयोगाचं फक्त एक उदाहरण सांगितलं. अशी अनेक उदाहरणे सांगता येतील.


आपल्याला प्राप्त झालेलं शिक्षण, यातून मिळालेलं ज्ञान आणि उपलब्ध झालेल्या विविध संधी या विनाश घडविण्यासाठी नसून नवनिर्मिती घडविण्यासाठी आहेत, हे आपण ध्यानात ठेवलं पाहिजे. विनाश घडवण्यात क्षणिक परंतु क्रूर आनंद असेल; परंतु निर्मिती करण्याचा आनंद हा स्वतःलाही आणि इतरांनाही फुलविणारा असतो. शिक्षणानं हेच घडायला हवं.

**डॉ. आ. ह. साळुंखे**

(लेखक हे ज्येष्ठ विचारवंत असून, संस्कृतचे निवृ त्त प्राध्यापकफ तसेच राज्याच्या सांस्कृतिक धोरण समितीचे माजी अध्यक्ष आहेत.)

## चार लाख मतदारांची ओळखपत्र आधारशी जोडणी नाहीच;

# गोंदिया विधानसभा मतदार संघ आघाडीवर




### जोडणीत अर्जुनी-मोरगाव मतदार संघ आघाडीवर

**जिल्ह्यात चार विधानसभा मतदार संघ असून मतदार ओळखपत्र आधारकार्ड सोबत जोडणीत गोंदिया विधानसभा मतदार संघ पिछाडीवर दिसून येत आहे. कारण, गोंदिया विधानसभा मतदार संघातील सर्वाधिक एक लाख ३१ हजार १०५ मतदारांची कार्ड जोडणी अद्याप झालेली नसल्याचे दिसून येत आहे. तेथेच मात्र अर्जुनी-मोरगाव विधानसभा मतदार संघ आघाडीवर असून येथील सर्वात कमी ८४ हजार ६८ मतदारांनी कार्ड जोडणी केली नसल्याचे दिसत आहे.**

### कार्ड जोडणीची कार्यवाही सुरू

**मतदार ओळखपत्र आधारकार्डशी जोडण्याबाबत भारत निवडणूक आयोगाने ४ जुलै २०२२ रोजी पत्र काढले आहे. त्यानुसार, जिल्हा प्रशासनाकडून मतदारांकडून ऐच्छिकपणे आधारची माहिती संग्रहित करण्याची मोहीम सुरू आहे. अशात ज्या मतदारांनी अद्याप कार्ड जोडणी केलेली नाही त्यांनाही कार्ड जोडणी करता येणार आहे.**

**गोंदिया:** आजघडीला प्रत्येकच कामासाठी आधारकार्ड अत्यंत महत्वाचे बनले असून आधारकार्डची मतदार कार्डशी जोडणी करण्याबाबत भारत निवडणूक आयोगाकडून ४ जुलै २०२२ रोजी पत्र काढण्यात आले आहे. आता जिल्ह्याची अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाली असूनही अद्याप तीन लाख ९८ हजार ४३६ मतदारांनी त्यांच्या मतदार ओळखपत्राची आधारकार्डशी जोडणी केली नसल्याचे उघडकीस आले आहे.

सन २०२४ हे वर्ष निवडणुकीचे वर्ष राहणार असून अगोदर लोकसभा व त्यानंतर विधानसभा व अन्य काही निवडणुका लागणार असल्याची शक्यता आहे. त्यानुसार, लोकसभा निवडणुकीला घेऊन शासनाकडून तयारीला सुरुवात झाली आहे. यात जिल्हा प्रशासनही मागे नसून जिल्ह्यातही लोकसभा निवडणुकीची प्रशासनाकडून तयारी सुरू झाल्याचे दिसत आहे.

विशेष म्हणजे, त्यादृष्टीने २३ जानेवारी २०२४ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. यामध्ये जिल्ह्यात एकूण १० लाख ८५ हजार २७२ मतदारांची नोंदणी करण्यात आली आहे.

या मतदारांना त्यांचे मतदार ओळखपत्र आधारकार्डशी जोडणी करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने ४ जुलै २०२२ रोजी पत्र काढले आहे. त्यानुसार, जिल्हा प्रशासनाकडून कार्यवाही सुरू असून आतापर्यंत जिल्ह्यातील सहा लाख ८६ हजार ८३६ मतदारांनी त्यांचे मतदार ओळखपत्र आधारकार्डशी जोडणी केले आहे. याची ६३.२९ एवढी टक्केवारी आहे. मात्र आश्चर्याची बाब अशी की, अद्याप तीन लाख ९८ हजार ४३६ मतदारांनी त्यांचे मतदार ओळखपत्र आधारकार्डशी जोडलेले नसल्याचेही दिसत आहे.

# महिला मतदार निभावणार महत्वपूर्ण भूमिका

### पुरुषांपेक्षा हजारी १७ महिला मतदार अधिक



**विधानसभा निहाय मतदार संख्या**

**अर्जुनी मोर. - १२६५९० पुरूष - १२६२४९ महिला**
**तिरोडा - १२९३६७ पुरूष - १३३२९६ महिला**
**गोंदिया - १५१५०८ पुरूष - १५७४६८ महिला**
**आमगाव - १३०५०४ पुरूष - १३०२८० महिला**

**गोंदिया:** मार्च महिन्यात लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहिर होणार, असा अंदाज आहे. त्यानुरुप शासकीय यंत्रणा व राजकीय पक्ष कामाला लागले आहेत. निवडणूक विभागाने मतदार यादीला पूर्णरुप दिले आहे. गोंदिया जिल्ह्यात पुरुषांपेक्षा महिला मतदारांची संख्या हजारी १७ ने अधिक आहे. विशेषत: महिला मतदारांची मतदानाची टक्केवारी अधिक असते. त्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीच्या रणसंग्रामात भाग्य आजमविणाऱ्या उमेदवारांचे भवितव्य ठरविण्यात महिला मतदारांची भूमिका महत्वपूर्ण ठरणार आहे. जिल्ह्यात ५ लाख ४७ हजार २९३ महिला मतदारांची संख्या आहे.

गोंदिया जिल्ह्याचा समावेश गोंदिया-भंडारा व गडचिरोली-चिमुर या दोन लोकसभा मतदार संघात येतो. गोंदिया जिल्ह्यात चार विधानसभा मतदार संघ आहेत. गोंदिया जिल्ह्यातील एकूण मतदार संख्या १० लाख ८५ हजार २७२ आहे. यामध्ये पुरुषांची संख्या ५ लाख ३७ हजार ९६९ तर महिला मतदारांची संख्या ५ लाख ४७ हजार २९३ एवढी आहे. मतदार संख्येच्या आधारावर पुरुषांच्या तुलनेत सरासरी हजारी १७ महिला मतदार अधिक आहेत. त्यामुळे आगामी होऊ घातलेल्या लोकसभा तथा विधानसभा निवडणुकीच्या रणसंग्रामात भाग्य आजमविणाऱ्या उमेदवारांचे भवितव्य निश्चित करण्यात महिला मतदारांची भूमिका महत्वपूर्ण ठरणार आहे. या अनुषंगाने कामाला लागलेले राजकीय पक्षाच्या इच्छूक उमेदवारांनी देखील महिला मतदारांना आकर्षित करण्यासाठी पायंडे उचलल्याचे दिसून येत आहे.

### महिला मतदारांवर फोकस

**आगामी काळात लोकसभा व विधानसभा निवडणूका होणार आहेत. या निवडणुकीत भाग्य आजमविणाऱ्या इच्छुकांनी तयारी सुरु केली आहे. विशेषत: मतदार व मतदान संख्येत महिलांची टक्केवारी लक्षात घेता इच्छूकांकडून महिला मतदारांना आकर्षित करण्यासाठी विशेष लक्ष दिले जात आहे. जानेवारी महिन्यात हळदी-कूंकू कार्यक्रम आयोजित करुन विविध भेटवस्तू देण्यात आले. त्याचबरोबर बचत गट, आशासेविका, अंगणवाडी सेविका यासह महिलांच्या विविध संघटनांशी संपर्क साधून त्यांच्याकडून आयोजित कार्यक्रमात आपली भागीदारी नोंदवून आपली उपस्थिती दर्शवित आहेत.**

### देवदर्शनासाठी महिलांची अयोध्या वारी

**आगामी निवडणुकीत महिला मतदारांची उपकृत होऊन का होईना आपल्यालाच मतदार करावे, हे दृष्टीकोन ठेवून इच्छूकांनी महिला मतदारांकडे साकडे टाकणे सुरु केले आहे. गाव प्रभागातील महिला मतदारांशी संपर्क साधून त्यांना देवदर्शनासाठी अयोध्या वारीचे नियोजन केले जात आहे. नुकतेच १६०० ते १७०० महिला पहिला जत्था देवदर्शनाहून परतल्याची चर्चा आहे.**

# कचारगड, मांडोदेवी, नागराधाम देवस्थानाला "अ" दर्जा द्या-आ.अग्रवाल



**गोंदिया:** जिल्ह्यातील सालेकसा तालुक्यातील कचारगड, गोंदियाला लागूनच ग्राम नागरा येथील पुरातन शिवमंदिर आणि गोरेगाव तालुक्यातील मांडोदेवी देवस्थानाला पर्यटन स्थळांचा ङ्गअफ दर्जा देण्यात यावा, अशी मागणी आमदार विनोद अग्रवाल यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

गोंदिया जिल्हा हा आदिवासी बहूल असून सालेकसा तालुक्यातील कचारगड येथे माँ काली कंकाली पारी कोपार लींगो यांचे देवस्थान असून भारतातील सर्वात मोठी नैसर्गिक गुहा म्हणून प्रसिद्ध आहे. दरवर्षी येथे कोया पोर्णिमेला ५ दिवसीय यात्रा भरत असून देशाच्या कानाकोपऱ्यातून लाखोंच्या संख्येने भाविक येतात. गोंदिया शहराला लागूनच ग्राम नागरा येथील पुरातन शिवमंदिर ऐतिहासीक वारसा प्राप्त असून शिवरात्रीला भाविकांची लाखोंच्या संख्येने उपस्थिती असते. तसेच गोरेगाव तालुक्यातील मांडोदेवी देवस्थानदेखील सुंदर पर्यटन स्थळ असून दरवर्षी येथे सामूहिक विवाह सोहळा आयोजित केला जातो. यात शंभरावर जोडपींच विवाह लावला जात असून लाखोंच्या संख्येने नागरिक उपस्थित असतात. हे स्थळ जंगलाने व्यापले असून जवळच असलेल्या तलावात वन्यजीव पाण्याच्या शोधात येत असल्याने पर्यटकसुद्धा मोठ्या संख्येने गर्दी करतात. निसर्गाचे वरदान लाभले असूनही निधीअभावी या स्थळांचा पाहिजे त्या प्रमाणात विकास झालेला नाही. या स्थळांचा विकास झाल्यास येथे नक्कीच पर्यटनाला वाव मिळणार आहे. करिता कचारगड, नागराधाम व मांडोदेवी देवस्थानाला ङ्गअफ दर्जा देण्यात यावा, अशी मागणी आमदार अग्रवाल यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे केली आहे.

### मुख्यमंत्र्यांनी दिले सचिवांना आदेश

आमदार अग्रवाल यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे मागणी केली असता त्यांची मागणी लक्षात घेता मुख्यमंत्री शिंदे यांनी सचिवांना तत्काळ प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले. यामुळे लवकरात लवकर या स्थळांना ङ्गअफ श्रेणी पर्यटन स्थळाचा दर्जा मिळणार अशी अपेक्षा आमदार अग्रवाल यांनी व्यक्त केली आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज आणि आदिवासी

अलिकडेच आदिवासीतील काही अधरपांगी अभ्यासकांकडून, रयतीचा राजा व बहुजनांचा राजा म्हणून आदिवासीमध्येहीछत्रपती शिवाजी महाराजाना आपला नायक असल्याबाबत आर्वाजून उभे करून, त्यांच्या प्रती आपल्या संवेदना व्यक्त करताना दिसतात.

छत्रपती शिवाजी महाराजांचा शिवनेरी किल्लावर जन्म आणि आदिवासी शहिदाचा "काला चबुतरा" शिवनेरी किल्लावर शिवाजी महाराजाचा जन्म झाला. त्यापूर्वी शिवनेरी किल्ला हा प्रस्थापित असलेल्या मुघलाकडून मांडलीकत्व स्विलारलेल्या महादेव कोळी आदिवासीच्यां ताब्यात होता. खरे तर शिवाजी महाराजांचा जन्म सुरक्षित जागेवर व्हावा, यासाठी माता जिजाऊच्या बाळंतपणासाठी महादेव कोळी आदिवासीनी शिवनेरी किल्लावर आश्रय दिला होता.

त्या काही काळा नंतर छत्रपती शिवाजी महाराज्याच्या राज्य व्यवस्थेत, शिवनेरी किल्लाचे राखण करीत असलेल्या १०८ पेक्षा जास्त महादेव कोळी आदिवासीच्या, हत्या करण्यात आल्या आणि ईतर आदिवासीना शिवनेरी किल्लावरून हाकलून शिवनेरी किल्ला ताब्यात घेतला. कत्तली केल्या गेलेल्या आदिवासीना शिवनेरी किल्लातच दफण करण्यात आले. किल्लात दफण केलेल्या जागेवर चबुतरा ऊभा करण्यात आला. या चबूतऱ्याला 'काळा चबूतरा' या नांवाने ओळखल्या जाते. यांचे ईतिहासात वर्णन आहे. या चबुतऱ्याखाली ज्या ज्या महादेव कोळी आदिवासीच्या कत्तली करून दफन करण्यात आल्या, त्यां सर्व महादेव कोळी आदिवासीच्यां नावांची यादी, त्या चबुतऱ्यावर कोरण्यात आली आहे. ती यादी आजही आपण सर्वांनां पहाण्यास मिळते. ज्या महादेव कोळी आदिवासी लोकांच्या कत्तल करण्यात आल्या, ते आदिवासी लोक छत्रपती शिवाजी महाराज ज्या "देवी तुळजा भवानीचे" भक्त होते, त्या देवीचे आदिवासी लोक भक्त नव्हते, तर ते निसर्ग पुजक होते. छत्रपती शिवाजी महाराज आणि समर्थ रामदास स्वामीव्दारा देवी तुळजा भवानीला कुलस्वामिनी माणून, एका बाजूने हिंदुत्वाचे एकनिष्ठने समर्थन करीत होते तर, दुसऱ्या बाजूने अप्रत्यक्षपणे ब्राम्हणवादी चौकटीला स्विकृत करून मुघल, मुस्लिम आदिवासीच्या विरोधात जंग छेडीत होते, हे आदिवासीनी आवार्जून समजून घेतले पाहिजे.

छत्रपती शिवाजी महाराज हे बहुजनांचे राजे होते, असा आपणासमोर ईतिहास मांडल्या जातो आहे. खरे तर, आजचा हा बहुजन वर्ग म्हणजे ओबीसी, एससी, एसटी, एनटी, अल्पसंख्याक मधील धर्म परिवतीत सर्व मागासवर्गीयाचा प्रवर्ग असल्याबाबत गर्भप्रेरीत अर्थ बोध होतो. छत्रपती शिवाजी महाराजानी आदिवासीसाठी काय केले? यांचीही मांडणी होण्याची गरज आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांचे आयुष्य हे फक्त ५१ वर्षे १ महिना १६ दिवसाचे होते. आज, छत्रपती शिवाजी महाराजाच्या नांवावर एकूण १६० किल्ले आहेत. हे किल्ले छत्रपती शिवाजी महाराज यांनी नक्कीच बांधले नाहीत. कारण एक किल्ला बांधण्यास वर्षोगणती काळ लागतो. उदाहरणा दाखल सांगता येईल की, गोंड राजाच्या चंद्रपूर किल्लाचे काम अनेक वर्षे सुरू होते, असे ईतिहातात वर्णन सापडते. छत्रपती शिवाजी महाराजाच्या आयुष्याचा कालावधिचा विचार केला तर, त्यांच्या ५० वर्षाच्या आयुष्यात एकूण १६० किल्ले त्यांच्याकडून बांधल्या जाणे शक्यच नाही. ते वयात आल्यावर किल्ले बांधले असे गृहीत धरले तरी, प्रत्येक दर २ ते ३ वर्षात एक किल्ला बांधण्यामध्येच आपले आयुष्य घालविले असेल तर, त्यांनी उर्वरीत आयुष्यातील किती काळ, राज्य चालविला असेल याचीही शहानिशा होने गरजेचे आहे.

### जुन्नर (पुणे) येथील "आदिवासी साहित्य व समरसता" या साहित्य संमेलनात "काळा चबुतराला"आदिवासी शहिदाचा दर्जा देण्याची मागणी

जुन्नर (पुणे) येथे समरसता साहित्य परिषदेच्या वतीने "आदिवासी साहित्य व समरसता" या विषयावर ९ ते १० फेब्रुवारी २०१३ ला १५ वे साहित्य संमेलन घेण्यात आले होते. या संमेलनाच्या अध्यक्षपदी संघाचे आजीवन पदाधीकारी असलेले मा.लक्ष्मणराव टोपले हे होते. त्या साहित्य संमेलनात सहभागी होण्यास आदिवासी विकास विभाग पुणे, कडून मलाही निमंत्रीत करण्यात आले होते. संमेलन शिवनेरी किल्लाच्या पायथ्याशी असल्याने, मला शिवनेरी किल्लावर जाण्याचा योग आला. त्या साहित्य संमेलनाचा मी एक वक्ता होतो. माझ्या भाषणांत बोलताना मी म्हणालो की, शिवनेरी किल्लावर कत्तल झालेल्या १०८ महादेव कोळी आदिवासी शहिदाबाबत शासकीय स्तरावरून ईतिहासाचे संशोधन करून त्या चबूतऱ्याला आदिवासी शहिदाचा दर्जा बहाल करावा, अशी मी मागणी करीत असतानाच, संघाच्या लोकांनी माझे भाषण उधळून लावले. बुकस्टॉल बंद पाळल्या गेले. स्टेजवर अफरातफर केल्या गेली आणि माझे भाषण बंद पाडले. त्या साहित्य संमेलनाव्दारा आदिवासी शहिदाबाबत चौकशी करण्याचा प्रस्ताव शासणाकडे पाठविण्यात आला की नाही असे मला समजले नाही. त्यावेळी मा. संभाजी संरकुडे साहेब (खअड) हे पुण्याला आदिवासी विभागाचे आयुक्त होते.

### छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचे १६० किल्ले

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मापुर्वी जे किल्ले अस्तित्वात होते, ते सर्वच किल्ले मुघल व गोंड आदिवासी राजानी बांधलेले किल्ले होते. मराठे भोसले राज्यांनी आदिवासी राज्यावर हल्ले चढवून/ आदिवासीच्या राजगाद्या काबीज केल्या. त्यातूनच मराठे भोसल्यानी, आपले मराठा राज्य प्रस्थापित केले. १६९८ मध्ये गडामंडलाच्या राज्यावर मराठे भोसल्यांनी आक्रमण करून ते ताब्यात घेतले. तर नागपूरच्या बख्त बुंलद शहा (ऊईके) यांचा मराठे भोसल्यानी पराभव केला.

१७ व्या शतकात बुंदेलांकडून आदिवासी राज्यावर अनेक हल्ले झाले, अँग्लो-मराठा युद्धात इंग्रजांचा पराभव झाल्यानंतर १८१८ पर्यंत त्यांनी आदिवासी क्षेत्रावर मराठे भोसल्यानी नियंत्रण ठेवले होते, अशा प्रकारे देशातील सर्वच आदिवासी राजा विरुद्ध हल्ले व लढाया करून मुघलाचे मांडलीक असलेल्या गोंड आदिवासीचे राज्य व किल्ले काबीज केली आणि आदिवासीकडून राजसत्ता काबीज करून घेतल्याचा ईतिहास सापडतो आहे. यावर संशोधन होण्याची गरज आहे.

**लटारी मडावी, नागपूर**
**मो.न. ९५१८३५९२६६**

# महिला कर्मचाऱ्यांना त्रास, तहसीलदार काळेंच्या बदलीकरीता जिल्हाधिकाऱ्यांना तक्रार

**सडक अर्जुनी:** येथील तहसील कार्यालयालायेच तहसीलदार निलेश काळे यांच्या विरोधात कार्यालयातील महिला कर्मचारी यांच्यासह इतर कर्मचऱयांनी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवून काळे यांची बदली करण्याची मागणी केल्याने ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर महसुल विभागात खळबळ माजली आहे.सडक अर्जुनी तहसिल कार्यालयातील महिला कर्मचाऱ्यांनी होत असलेल्या मानसिक व शारिरीक त्रासाबद्दल केलेल्या तक्रारीमुळे जिल्ह्यात खरंच विशाखा समिती प्रत्येक कार्यालयात निष्पक्ष काम करते काय यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत. कर्मचाऱ्यांनी दिलेल्या पत्रानुसार निलेश काळे यांनी ३ जुलै २०२३ रोजी तहसीलदार पदाचा प्रभार सांभाळला. तेव्हापासून तहसील कार्यालयातील कर्मचा-यांना त्रास देत आहेत.शासन परिपत्रकानुसार महिला कर्मचाऱ्यास ६ वाजे नंतर थांबविता येत नाही.असे असतांनाही रात्री ९ ते १० वाजेपर्यंत बळजबरीने धमकावून कार्यालयात थांबण्यास बळजबरी करीत असल्याचे म्हटले आहे.




सदर अधिकारी मनात येईल तसे कर्मचाऱ्यांशी बेशिस्तपणे वागून महिला कर्मचा-यांना अपमानास्पद वागणूक देतात. सुट्टीच्या दिवशी कार्यालयात या अन्यथा कारणे दाखवा नोटीस, बिन पगारी रजा व निलबंनाची कारवाई करण्याची धमकी देत असल्याचे म्हटले आहे. कार्यालयीन कर्मचारी यांनी केलेल्या कार्यालयीन कामाच्या कागदपत्रावर सदर अधिकारी हे वेळीच स्वाक्षरी करीत नाही. स्वाक्षरी करण्यास टाळाटाळ करतात. त्यामुळे वरिष्ठ कार्यालयात माहिती देण्यासह कार्यालयीन काम करण्यास अडचण होत आहे.

सदर अधिकारी सर्व कार्यालयीन फाईल,पत्र बिल,माहिती ईत्यादी दस्ताऐवज आपल्याकडे दाबून ठेवून स्वाक्षरी करीत नाही.त्यातच तहसील कार्यालयात सहा कर्मचारी कार्यरत असून सर्व कर्मचा-यांकडे दोन ते तीन विभागाचा अतिरीक्त कार्यभार त्यामुळे सर्व कर्मचा-यावर कामाचा ताण आधीच आहे. वरिष्ठ कार्यालयाकडून प्रलंबित असलेल्या कामाकरीता विचारणा केल्यावर प्रलंबित काम असल्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कर्मचा-यावर टाकून त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावून विनाकारण त्रास देत असल्याचे म्हटले आहे.सदर अधिकारी मानसिक त्रास देवून मनोबल खच्चीकरण करीत असल्याने अशा मनमानी कारभार करणा-या अधिका-याची तात्काळ बदली करण्यात यावी,अशी मागणी येथील कर्मचा-यांनी पत्राद्वारे जिल्हाधिकारी व उपविभागिय अधिकारी यांना केली आहे. तसेच सदर अधिका-याची बदली न झाल्यास काम बंद आंदोलनाचा इशारा दिला आहे.

# विनाअट जुनी पेन्शन योजना लागू करा, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांत तीव्र संताप

**गोंदिया :** राज्यातील १ नोव्हेंबर २००५ रोजी व त्यानंतर नियुक्त कर्मचारी-अधिकाऱ्यांसाठी सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करण्याची विधानसभेत मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली. ही घोषणा शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांवर अन्याय करणारी असून निवडणूकीच्या तोंडावर केलेली ही घोषणा फसवी असल्याची टीका आमदार सुधाकर अडबाले यांनी केली.



शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी गेल्या अनेक वर्षांपासून जुनी पेंशन योजना लागू करण्याच्या मागणीला घेऊन सरकारशी लढा देत आहेत. या लढ्यामुळे राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली व जुनी निवृत्तीवेतन योजना यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत वित्त विभागाचा १४ मार्च २०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता. समितीचा अहवाल येण्यास आठ महिन्यांचा कालावधी लागला. समितीने सरकारला सादर केलेला अहवाल सभागृहात सादर करून जुनी पेंशन योजना लागू करावी, अशी मागणी सातत्याने आमदार सुधाकर अडबाले सरकारकडे करीत होते.

अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२४ मधील शेवटच्या दिवशी राज्यातील १ नोव्हेंबर २००५ रोजी व त्यानंतर नियुक्त कर्मचारी- अधिकाऱ्यांसाठी सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करण्याची विधानसभेत मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली. या योजनेत नियत वयोमानानुसार (३० वर्ष सेवा पूर्ण झाल्यास) निवृत्त होणारे कर्मचारी यांनी जर प्रस्तावित योजनेचा विकल्प दिल्यास त्यांना त्यांच्या शेवटच्या वेतनाच्या ५० टक्के इतके निवृत्तीवेतन व त्यावरील महागाई वाढ तसेच निवृत्तीवेतनाच्या ६० टक्के कुटूंब निवृत्तीवेतन व त्यावरील महागाई वाढ मिळेल. जुन्या पेंशन योजनेत पेंशन मिळण्यासाठी कोणतीही कपात होत नाही. मात्र, या योजनेत एनपीएस प्रमाणे १० टक्के अंशदानाची कपात नापरतावा सूरुच राहणार आहे. जुन्या पेंशन योजनेत नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना शेवटच्या पगाराच्या ५० टक्के पेंशन मिळण्यासाठी केवळ १० वर्ष सेवा पुरेशी होती. या योजनेत ३० वर्ष सेवेची अट असणार आहे.

जुन्या पेंशन योजनेत स्वेच्छा सेवानिवृत्तीसाठी २० वर्ष सेवा पुरेशी होती. तर या योजनेत तसा कोणताच नियम नाही. १९८२ च्या जुन्या पेन्शन योजनेंतर्गत येणाऱ्या कर्मचाऱ्यांना वेतन आयोगाच्या शिफारशी लागू होतात, दर १० वर्षात नवीन वेतन आयोगानुसार पेंशन पुनर्रचना करण्यात येते, ज्यात पेन्शन बेसिक जवळपास दुप्पट वाढत असते. तर या योजनेत नवीन वेतन आयोगानुसार पेंशन पुनर्रचना होण्याचा काही संबंध नसणार आहे.

ज्या पेंशन बेसिकवर कर्मचारी निवृत्त झाला असेल, तो आजीवन त्याच बेसिकवर पेंशन घेईल. यामुळे जुन्या पेंशन धारकांच्या पेंशनच्या तुलनेत चार-पाच पट मागे राहील. जुन्या पेंशन योजनेत दर ६ महिन्याला पेंशनवर महागाई ५ ते ६ टक्के भत्ता वाढत असतो तर या योजनेत डीए वाढ नसणार आहे.

सोबतच जुन्या पेंशन योजनेत अंशराशीकरण पेंशन विक्री करता येते. जीपीएफची रक्कम व्याजासह मिळत होती. या नवीन योजनेत अशी कुठलीच तरतूद करण्यात आलेली नाही. तसेच १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त व त्यानंतर टप्याटप्याने १०० टक्के अनुदानावर आलेल्या राज्यभरातील शाळांवर कार्यरत शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा सुद्धा या योजनेत समावेश करण्यात आलेला नाही. समान काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना असमान पेंशन देण्याचे धोरण सरकार आखत असून कर्मचाऱ्यांत तेढ निर्माण करण्याचे काम सरकार करीत आहेत. यामुळे राज्यातील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांत सरकारप्रती तीव्र असंतोष पसरला आहे.

जुन्या पेन्शन योजनेची मागणी होत असताना सुधारीत पेंशन योजनेची मुख्यमंत्र्यांनी केलेली घोषणा फसवी असून कर्मचाऱ्यांचे भविष्य अंधारात टाकणारी आहे. निवडणुकीच्या तोंडावर सरकारने दिलेले हे गाजर असून शिक्षक-राज्य कर्मचारी यास बळी पडणार नाहीत. नकारात्मक असणारे सरकार आज शिक्षक-राज्य कर्मचाऱ्यांच्या लढ्यामुळे सकारात्मक होताना दिसत आहे. यामुळे सरकारने विनाअट १९८२-८४ ची जुनी पेंशन योजना लागू करण्याच्या मागणीसाठी आपला हा लढा असा सुरू राहील, अशी माहिती आमदार सुधाकर अडबाले यांनी दिली.

# खाजगी,भाड्याच्या वाहनावर महाराष्ट्र शासनाची पाटी

**गोंदिया :** केंद्र, राज्य शासनाचे असलेले वाहन सोडून इतर खासगी, कंत्राटी व अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या खासगी वाहनावर महाराष्ट्र शासन, भारत सरकार सेवार्थ लिहिलेले आढळल्यास कारवाईची तरतूद आहे.पोलिसांसह अन्य अधिकाऱ्यांचाही यामध्ये समावेश आहे. कारवाई टाळण्यासाठी वाहनावर महाराष्ट्र शासन किंवा भारत सरकार सेवार्थ अशी पाटी लावून फिरण्याचे प्रमाण वाढले आहे. याबाबत परिवहन आयुक्तांनी अशा वाहनांवर कारवाईचे आदेश आरटीओंना दिले असले तरी जिल्ह्यात अशी पाटी लावून राजरोसपणे प्रवास केला जात आहे. अनेकदा ही वाहने खाजगी व कौटुंबिक कार्यक्रमांमध्येही दिसून येतात.




शासकीय वाहन व त्यावरील खर्च शासनाला पेलवत नसल्याने अधिकाऱ्यांसाठी भाड्याने वाहन उपलब्ध केली जातात. जिल्ह्यातील विविध विभागातील अधिकाऱ्यांसाठी भाडेतत्त्वावर वाहने घेतली आहेत. नियमानुसार या वाहनांवर महाराष्ट्र शासन, भारत सरकार सेवार्थ अशी पाटी लावणे दंडणीय अपराध आहे. असे असताना या भाडेतत्त्वावरील वाहनांवर महाराष्ट्र शासन, भारत सरकार सेवार्थ असे लिहीलेली पाटी दिसून येते. रुबाब मारण्यासाठी घरातील एखादा सदस्य सरकारी नोकरीत असला तरी सारे कुटुंबच अशी पाटी लावून फिरत असतात. यातही अनेकांचा काहीही संबंध नसताना केवळ पोलिस कारवाई टाळण्यासाठी, टोलनाक्यावर टोलमाफी मिळण्यासाठीही असे प्रकार करत असतात. राज्य शासनाकडील वर्ग एकच्या अधिकाऱ्यांना शासनाकडून वाहन पुरविले जाते. या वाहनावर महाराष्ट्र शासन असा उल्लेख करणे अनिवार्य आहे. त्यामुळे या वाहनांना पाटी लावण्यास शासनाची परवानगी आहे.

वाहनावर महाराष्ट्र शासन लिहून अनेक गैरप्रकार होतात. अगदी काही गुन्हेगारी कारवायाही झाल्याचे यापूर्वी घडले आहे. या प्रकारामुळे शासकीय पाटीचा गैरवापर झाल्याचे समोर आले आहे. वाहतूक नियमांचे पालन करण्यासाठी आरटीओचे पथक जिल्ह्यात फिरते. पथकाला असे वाहन आढळून आल्यास व ते खासगी, भाडेतत्त्वावरील असले तर त्यावर दंडात्मक कारवाई करणे अपेक्षित आहे. परंतु आरटीओचेही या प्रकाराकडे दुर्लक्ष होत आहे. केवळ शासकीय वाहनावरच महाराष्ट्र शासन लिहिण्यास परवानगी आहे. इतर वाहनांवरील उल्लेख दंडनीय अपराध असला तरी कारवाई होताना दिसून येत नाही.

# वाहतूक पोलिसांचा २०० वाहन चालकांना दणका

**गोंदिया :** जिल्ह्यासह शहरात वाहन चालकांना शिस्त लागावी व वाहतुकीचे नियम पाळावे, यासाठी वाहतूक पोलिसांकडून सातत्याने प्रयत्न केले जात आहे. परंतु, पोलिसांच्या प्रयत्नांना धुळीस मिळविण्याचे काम वाहन चालक करीत असतात. यावर आळा घालण्यासाठी वाहतूक पोलिसांनी कारवाई करीत २०० वाहन धारकांना दणका दिला आहे. दंडात्मक कारवाई करीत शुल्क आकारणी करण्यात आली.

शहरात वाहतुकीतील बेशिस्त काही नविन नाही. त्यातही वाहतूक नियम न पाळता मनमर्जी कारभार शहरासह जिल्ह्यातील रस्त्यावर सुरू आहे. यावर आळा घालण्यासाठी यंत्रणा असली तरी वाहन चालक मार्ग शोधून स्वतःचा बचाव करून घेतात. यावर आळा घालण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलीस अधीक्षक नित्यानंद झा यांनी जिल्ह्यातील वाढते वाहन अपघात आणि त्यातही विशेष म्हणजे वाहन अपघातात वाढते मृत्यूचे प्रमाण यावर आळा बसावा. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आणि जिल्ह्यातील नागरिकांना वाहतूक नियमांची माहिती व्हावी, याकरीता जनजागृती करण्याचे निर्देश जिल्हा वाहतूक शाखेला दिले आहेत.

वरिष्ठाच्या निर्देशानुसार वाहतूक शाखेचे प्रभारी पो.नि.किशोर पर्वते, सपोनि राहुल पाटील यांचे नेतृत्वात वाहतूक शाखेतील अधिकारी-अंमलदार यांनी वाहतुक नियमनांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन, विना नंबर प्लेट, फॅन्सी नंबर प्लेट, क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी बसविणे, विना सीट बेल्ट, कर्न कर्कश हॉर्न वाजविणारे, अडथळा निर्माण होईल अशी पार्किंग करणे, पोलीसांचा ईशारा न पाळण अशा एकूण २०० वाहनांवर कारवाई करीत त्यांच्याकडून दंड वसुल करण्यात आला आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे, असे आवाहन पोलिस दलातर्फे करण्यात आले आहे.

# विधान परिषदेत विचारवंत, साहित्यिकांना संधी द्या

### अ.भा.साहित्य परिषद विदर्भ प्रांताची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**आमगाव:** धुळे जिल्ह्यातील अमळनेर येथे सुमारे तीन आठवड्यापुर्वी म्हणजेच २ फेब्रुवारी ते ४ फेब्रुवारीदरम्यान पार पडलेल्या ९७ च्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सरकार साहित्यीक आणि विचारवंतांना घाबरते का? असा प्रश्न उपस्थित केला होता. हा मुद्दा विस्तारात सांगताना त्यांनी संविधानात तरतूद असतानाही राज्यसभा आणि विधान परिषदेत साहित्यिक आणि विचारवंतांना राज्यपाल-नामनिर्देशित सदस्य म्हणून स्थान दिले जात नाही. त्याची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी अखिल भारतीय साहित्य परिषदेचे विदर्भ प्रांत अध्यक्ष ॲड. लखनसिंह कटरे यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली.

डॉ.रवींद्र शोभणे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात व्यक्त केलेली खंत महाराष्ट्र शासनाने अतिशय गांभीर्याने घ्यावी आणि या संदर्भात साहित्यिकांनाही संधी देऊन साहित्यिकांवर झालेला अन्याय दूर करावा अशी मागणी करणारे निवेदन अखिल भारतीय साहित्य परिषदेच्या विदर्भ प्रांत पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, तसेच सत्ताधारी महायुतीतील भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांना ई-मेलद्वारे पाठविले. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १७१/३ इ आणि १७१/५ अन्वये विधान परिषदेत राज्यपाल राज्य शासनाच्या शिफारसीनुसार कला, साहित्य, विज्ञान, समाजसेवा आणि सहकार या क्षेत्रातील एकुण बारा तज्ञ आणि अनुभवी व्यक्तींची विधान परिषदेत नामनिर्देशित सदस्य म्हणून नियुक्ती करतात. ही नियुक्ती सहा वर्षांसाठी असते आणि या सदस्यांना विधान परिषद सदस्यांचे सर्व अधिकार दिले जातात. या सदस्यांच्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा त्यांच्या क्षेत्रातील समस्यांच्या सोडवणुकीसाठी आणि प्रशासन सुचारु रुपाने चालविण्यासाठी होतो. १९६० मध्ये महाराष्ट्र शासन महाराष्ट्राचे गठन झाल्यापासून विधान परिषदेत सुमारे ११८ राज्यपाल-नामनिर्देशित सदस्य नियुक्त झाले असल्याचे या निवेदनात नमूद करण्यात आले.

**आतापर्यंत झालेली नियुक्ती**

साहित्य आणि कलाक्षेत्रातील फक्त दहा ते बारा व्यक्तींनाच नियुक्त्या देण्यात आल्या. याकडेही लक्ष वेधले आहे. या सदस्यांमध्ये ग.दि.माडगुळकर, वसंत देसाई, शकुंतला परांजपे, ना.धो.महानोर, अनंत गाडगीळ, डॉ. रफिक झकेरिया, मा.गो. वैद्य, नरूभाऊ लिमये प्रभुतींचा समावेश असल्याचेही म्हटले आहे. उर्वरित १०६ सदस्य हे राजकीय क्षेत्रातील व्यक्ती असून त्यांना समाजसेवा आणि सहकार क्षेत्रातील म्हणून दाखविल्याचा दावाही या निवेदनात करण्यात आला आहे. या नियुक्त्या करताना जे समाजातील तज्ञ व्यक्ती निवडणूक लढवू इच्छित नाही किंवा निवडून येऊ शकत नाहीत. मात्र त्यांच्या ज्ञानाचा उपयोग केला जाऊ शकतो, असे निवेदनात म्हटले आहे.

# जलजीवनच्या १४२ कामांची थांबली गती

### सेवापुरवठादारांनी ७ दिवसांत कामे सुरु करावी, अन्यथा पुनर्निविदा करणार, सीईओंचे आदेश



**गोंदिया:** केंद्र सरकारच्या जलजीवन मिशन अंतर्गत ग्रामीण भागांतील कुटुंबांना स्वच्छ व शुद्ध पाण्यासाठी नळ कनेक्शन दिले जाणार आहे. त्यातून प्रत्येक व्यक्तीला दररोज ५५ लिटर पाणी मिळेल. यासाठी जिल्ह्यात एकूण १,२३८ योजना मंजूर करण्यात आल्या. त्यापैकी १४२ योजनांची कामे अद्याप सुरुच झालेली नाहीत. ज्या गावांत अद्याप कामे सुरु झालेली नाहीत, त्या सेवापुरवठादारांनी ७ दिवसांत कामे सुरु करावी, अन्यथा त्या कामासाठी पुन्हा निविदा करण्यात येईल, असे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी मुरुनानंथम एम.यांनी दिले.

### सात दिवसांत द्या अहवाल

**सुरु झालेल्या योजनांची कामे ३१ मार्चपुर्वी पूर्ण करण्याच्या सुचनाही त्यांनी दिल्या. तसेच सर्व गटविकास अधिकारी आणि त्यांच्या यंत्रणेने कामाची पाहणी करुन इत्यंभूत माहिती ७ दिवसांत सादर करण्याचे आदेश दिले. यासाठी जिल्हास्तरावर संनियंत्रण समिती गठित करण्यास सांगितले. ज्या कामांसाठी निधी मंजूर झाला त्याच कामावर खर्च होत आहे किंवा नाही, याची खात्री करणे, योजना पूर्ण झाल्यावर त्याची तपासणी थर्ड पार्टी एजन्सीकडून करावी. काम मंजुरीनुसार झाले नसल्यास संबंधित सेवा पुरवठाधारकावर बॅल्क लिस्टेट करण्यात येईल. योजना पूर्ण झाल्यानंतर ग्रामपंचायतला हस्तांतरण करणे आवश्यक आहे. सर्वांना मुबलक पाणी वैयक्तिक नळाद्वारे मिळत असल्याची खात्री केल्यानंतर सदर गाव हर घल जल घोषित करावे. अशा सुचनाही त्यांनी यावेळी दिल्या.**

जलजीवन मिशन अंतर्गत सध्या १,०९६ गावांमध्ये कामे सुरु असून या महत्वाकांक्षी योजनेमुळे ग्रामीण भागातील महिलांच्या डोक्यावरील हंडा कायमचा खाली उतरणार आहे. यासाठी हर घर जल नळ योजनेंतर्गत फेब्रुवारी २०२४ पर्यंत २ लाख २४ हजार ७२२ कुटुंबांना पिण्याच्या पाण्याचे मोफत नळ कनेक्शन दिले आहेत. उर्वरित ८१ हजार ८३७ कुटुंबाना नळ देणे शिल्लक आहेत. यासाठी एकूण १,२३८ पाणीपुरवठा योजनांना मंजुरी मिळाली असून १४२ योजनांच्या कामाची गती फारच मंथ आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मुरुनांनथन एम. यांनी याबाबत नाराजी व्यक्त करीत पुन्हा निविदा काढण्याचे आदेश दिले.

जिल्हा परिषदेत पार पडलेल्या आढावा सभेला उपमुख्य कार्यकारी अधिकारी (अ) सामान्य व ग्रामपंचायत खामकर, प्रकल्प संचालक जलजीवन मिशन आनंद पिंगळे, कार्यकारी अभियंता सुमीत बेलपत्रे, सहाय्यक उपवनसंरक्षक वनविभाग, कार्यकारी अभियंता लपा, वीज वितरण कंपनी, वनविभाग, गटविकास अधिकारी, वरिष्ठ भुवैज्ञानिक, उपविभागीय अभियंता, शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता, कन्सल्टन्सी, थर्ड पार्टी एजेंसी यांच्यासह विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# भर्रेगाव-कळूसावटोला रस्त्याला भ्रष्टाचाराचे ग्रहण

**देवरी:** सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व कंत्राटदाराच्या भ्रष्टाचाराने किती कळस गाठले आहे, याचे प्रत्यय भर्रेगाव ते कळूसावटोला रस्ता डांबरीकरणाच्या कामावरुन येत आहे. १० किमीच्या रस्ता डांबरीकरणासाठी ४ कोटी ६० लाख रुपये खर्च करण्यात आले असले तरी डांबराचे थिगळच लावण्यात आल्याचे स्पष्ट दसून येतआहे. चाळण झाल्यासारखा हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाला दिसत नाही का? असा प्रश्न उपस्थित होऊ लागेला आहे.



या प्रकरणाची चौकशी करुन संबंधित अभियंता व कंत्राटदारावर कारवाई करावी, अशी मागणी भर्रेगाव, नकटी, कळूसावटोला परिसरातील नागरिकांनी केली आहे.

राज्य शासनाकडून दरवर्षी नक्षलग्रस्त क्षेत्राय पायाभूत सुविधा बळकट व्हावे, या दृष्टीकोनातून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला जातो. यंत्रणेला त्या निधीची कशी विल्हेवाट लावते, याचे उदाहरण ४.६० कोटीच्या सुरु असलेल्या कामावरुन समोर आले आहे. भर्रेगाव ते कळूसावटोला या १० किमी अंतराच्या डांबरीकरणासाठी ४ कोटी ६० लक्ष रुपये मंजूर झाले. मात्र कंत्राटदाराने कमिशनबाजीमुळे अत्यंत निकृष्ट बांधकाम केले. त्यामुळे दोन महिन्यांतच या मार्गावर खड्डे पडले. डांबराचे प्रमाण अत्यंत कमी असल्याने गिट्टी बाहेर आली असून रस्त्याची चाळण झाली आहे. कंत्राटदाराने लोकप्रतिनिधी व अभियंताना हाताशी धरून भ्रष्टाचार केल्याचा आरोप परिसरातील नागरिकांनी केला आहे. रस्ता बांधकामाची चौकशी करुन कारवाई करण्यात यावी तसेच रस्त्याचे पुन्हा डांबरीकरण करण्यात यावे, अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

# सुंदर गाव स्वच्छ गाव पुरस्काराने इर्री ग्रामपंचायत सन्मानित



**गोंदिया:** जिल्हा परिषदेच्या पंचायत विभागाच्यावतीने पार पडलेल्या सरपंच मेळाव्यात तालुक्यातील ग्राम पंचायत इर्री ला सुंदर गांव पुरस्कारने सन्मानित करण्यात आले.जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले, मुख्य कार्यकारी अधिकारी एम.मुरुगानंथम तसेच जिल्हा परिषद सभापती यांच्या हस्ते तालुकास्तरावरील आर.आर.आबा पाटील सुंदर गाव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

इर्री ग्रामपंचायत सरपंच देवांनंद अभिमन गड़पायले, उपसरपंच भाऊलाल लहू तरोने, ग्रामसेवक रामेश्वर जमईवार, ग्राम पंचायत सदस्य मनीराम उपवंशी, दिलीप ब्राम्हणकर, जितेंद्र वरखड़े, सौ. उर्मिला उपवंशी, सौ. सयवंता नागपुरे, सौ.वर्षा चौहान, सौ. धंवनता वरखड़े, सौ. चित्ररेखा चौधरी, ग्राम रोजगार सेवक नरेशकुमार ठकरेले, ग्राम पंचायत कर्मचारी सुनील ठकरेले यांनी हा पुरस्कार स्विकारला.यावेळी गोंदिया जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी गोविंद खामकर,पंचायत समितिचे सभापती मुनेश रहांगडाले, गट विकास अधिकारी आनंदराव पिंगले, विस्तार अधिकारी सुरेश निमजे उपस्थित होते.

# गतिरोधकांच्या नियमांना शहरात तिलांजली

### दुष्टपरिणामामुळे अनेकांना पाठ व कंबरदुखीचा त्रास: वाहनांचेही मोठे नुकसान, वयोवृद्धांना सर्वाधिक फटका

**गोंदिया:** शहरातील रस्त्यांवर जागोजागी गतिरोधक तयार करण्यात आले आहे. त्या गतिरोधकांमुळे अनेकांना पाठदुखी, मणक्याचे आजार उद्भवत आहे. नागरिकांना गतिरोधकामुळे दुष्टपरिणाम माहित नसल्यामुळे ते आपल्या घराच्या आजूबाजूला गतिरोधकांची मागणी करतात. मात्र, लोकांना जागृत करण्यासाठी नगरपंचायतने गतिरोधकांच्या दुष्टपरिणामावर नागरिकांमध्ये जनजागृती करावी व नियमांना हरताळ फासणारे गतिरोधक हटविण्याची मागणी काही सुज्ञ नागरिकांनी केली आहे.

### वायू व ध्वनी प्रदुषणात वाढ

**वायू व ध्वनी प्रदुषणातही वाढ होत आहे. वाहनाचा वेग कमी करणे आणि पुन्हा वेगात पळविणे, यामुळे गतिरोधक परिसरात प्रदुषण वाढत आहेत. गतिरोधक असलेल्या क्षेत्रात फक्त ब्रेक आणि इंजिनच्या आवाजामुळे दुचाकी, ट्रक, मालवाहू वाहनांतील साहित्य आदळत असल्याने ध्वनी प्रदुषणात वाढ होऊन त्याचे दुष्टपरिणाम आसपासच्या नागरिकांवर होतात.**

### आपत्कालीन सेवांवर परिणाम

**गतिरोधकांमुळे आपत्कालीन सेवावर परिणाम होत आहे. आपत्कालीन रुग्णवाहिका, अग्निशमन दलाच्या गाड्यांचा वेग कमी झाल्यामुळे अनेकदा रुग्णाचा जीव जाऊ शकतो. आगीने भयंकर रुप धारण केल्यानंतर अग्निशमन दलापुढे संकट निर्माण होते. वरील सर्व गोष्टी लक्षात घेता गतिरोधक कमीत कमी प्रमाणात टाळण्याची मागणी आहे.**

शहरात गतिरोधक बसविताना नियमांचे पालन करुनच गतिरोधक तयार करायचे असतात. मात्र, शहरात गतिरोधकांची उंची किती असावी? दोन्ही बाजूला उतार कसा असावा? याबाबत माहिती नसल्याचे चित्र आहे. अशातच शहरातील अनेक भागांत हे नियम सर्रास पायदळी तुडविले जात आहेत. त्यामुळे अनेकांना पाठ व कंबरदुखीचा त्रास होऊ लागला आहे. अनेकांच्या वाहनांचेही नुकसान होत असल्याने त्यांच्या तक्रारी वाढल्या आहेत. गतिरोधकांमुळे रहिवासी भागात वाहतुकीत वाढ होऊन मुख्य रस्त्यावर गतिरोध असल्याने वाहनचालक रहिवासी भागातील रस्ते वापरत असल्याने अपघातांचे प्रमाणही वाढले आहे.



गतिरोधकांमुळे विशेषत: वयोवृद्ध नागरिकांच्या शरीरावर दुष्टपरिणाम दिसत आहे. अनेक चालक, प्रवाशांना पाठ, मणक्यांचा त्रास वाढला आहे. सतत बसणाऱ्या झटक्यांमुळे पाठीत आणि मणक्यात दुखणे, चिडचिड होणे, विशेषत: गर्भवती महिला, लहान मुले आणि वृद्ध व्यक्तींवर याचा अधिक परिणाम होत आहे.

# आ.विजय रहांगडाले यांच्या हस्ते न.प.तिरोडा येथे ५.१० कोटी विकासकामांचे भूमिपूजन संपन्न

**तिरोडा:** नगर परिषद तिरोडा येथे आमदार विजय रहांगडाले यांनी विविध विकासकामांकरिता ८.०० कोटी रुपये मंजूर असून त्यापैकी ५.१० कोटी रुपये कामांचे भूमिपूजन संपन्न झाले यामध्ये प्रामुख्याने प्र.क्र.०१ मध्ये साई प्लाझा ते टेलिफोन कार्यालय पर्यत सिमेंट रस्ता बांधकाम १.२५ कोटी, टेलिफोन कार्यालय ते माजी सैनिक सभागृह पर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम १.२५ , प्र.क्र.५ येथे बाबा भैरम यांच्या घरापासून ते मोहनलाल चौकपर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम ८०.०० लक्ष,.क्र.८ येथे सुकडी नाका ते तुकडोजी महाराज चौकपर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम १.१० कोटी सिमेंट नाली बांधकाम ४०.०० लक्ष, सिमेंट नाली व दुभाजक बांधकाम ३०.०० लक्ष कामांचा समावेश असून भूमिपूजन कार्यक्रमाला प्रामुख्याने आमदार विजय रहांगडाले, भाजप शहरअध्यक्ष स्वानंद पारधी, अजय गौर,सुनील पालांदूरकर,अशोक असाटी, सदस्य राजेश गुनेरीया, बबलू ठाकूर, राखी गुनेरीया, राजेश मलघाटे, मजूर सहकारी सचिव उमाशंकर हारोडे, मकरम लिल्हारे, वसीम शेख, संजय बैस, नितीन पारधी, दिगंबर ढोके, प्रकाश सोनकावडे,अमोल तीतीरमारे, नितीन पराते, अनुप बोपचे, सुनील नागरिकर, वासू कनोजे, आशु अग्रवाल , विनय खेताडे, मोंटू पालांदूरकर, बादल हिरापुरे, विक्की साखरवाडे, ममता दुबे, लक्ष्मीनारायण दुबे व शहरातील कार्यकर्ते उपस्थित होते.



# गावाच्या विकासासाठी सरपंच प्रशिक्षण गरजेचे

## जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांचे प्रतिपादन : सरपंच मेळावा थाटात, ग्रामपंचायतींचा सत्कार

**गोंदिया :** अधिकारी, कर्मचारी नेहमी प्रशिक्षण घेतात. त्यामुळे ते उत्तम प्रशासन चालवितात. त्याचप्रमाणे गावातील सरपंचानी सुध्दा प्रशिक्षण घेणे गरजेचे आहे. प्रशिक्षित सरपंच गावाचा सर्वांगिण विकास साधू शकत असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषद गोंदियाचे अध्यक्ष श्री. पंकज रहांगडाले यांनी केले.




न्यू ग्रिनलँड लॉन येथे (ता. १) जिल्हास्तरीय सरपंच मेळावा पार पडला. त्यावेळी अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी विचारपीठावर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. एम. मुरूगानंथम, अर्थ व बांधकाम समिती सभापती श्री. योपेंद्रसिंह टेंभरे, महिला व बालकल्याण समिती सभापती श्रीमती सविता संजय पुराम, समाज कल्याण समिती सभापती श्रीमती पूजा अखिलेश सेठ, गोंदिया पंचायत समितीचे सभापती श्री. मुनेश रहांगडाले, सालेकसा पंचायत समितीच्या सभापती प्रमिला गणवीर, देवरी पंचायत समितीच्या सभापती अंबिका बंजार, जिल्हा परिषदेचे गटनेता लायकराम भेंडारकर, गटनेता श्री. सुरेश हर्षे, श्रीमती आनंदा वाढीवा, जिल्हा परिषद सदस्या श्रीमती उषाताई मेंढे, अंजली अटरे, जगदीश बावनथडे, श्री. प्रविण पटले, श्री. विजय उईके, श्री. रितेशकुमार मलघाम, श्रीमती वंदना काळे, श्री. हनवंत वट्टी, श्रीमती राधिका धरमगुडे, श्री. चर्तुभूज बिसेन, श्रीमती उषाताई शहारे, श्रीमती लक्ष्मी तरोणे, श्रीमती कविता रंगारी, श्रीमती विमलताई कटरे, श्रीमती राधिका धरमगुडे, श्रीमती अश्वीनी पटले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. तानाजी लोखंडे यावेळी उपस्थित होते.

ग्रामसेवकांना गावातील इत्थंभूत माहिती असावी, यावर भर देत गावांच्या विकासासाठी मिशन मोड मध्ये कार्य करण्याची गरज मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. एम. मुरूगानंथम यानी व्यक्त केली. बांधकाम समिती सभापती श्री. योपेंद्र टेंभरे, महिला बालविकास समिती सभापती श्रीमती सविता संजय पुराम, समाजकल्याण समिती सभापती श्रीमती पूजा अखिलेश सेठ यांनी गाव विकासावर भर देत समयोचित विचार व्यकत केले. तर ग्रामपंचायत संघटना कच्छ गुजरातचे अध्यक्ष मा. श्री. सुरेश चंगा आणि आदर्श ग्रामसंसद मिझापूर नेरी जिल्हा वर्धाचे सरपंच बाळाभाऊ सोनटक्के यांनी आपल्या मार्गदर्शनातून ग्रामविकासाची सविस्तर माहिती दिली.

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेंब आंबेडकर, राष्ट्रपिता महात्मा गांधी, संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या छायाचित्राला माल्यार्पण करुन दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. दरम्यान जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी जलजीवन मिशन अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या जलरथाला हिरवी झेंडी दाखवून रवाना केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. गोंविद खामकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विस्तार अधिकारी श्रीमती वैशाली खोब्रागडे आणि माहिती, शिक्षण व संवाद तज्ञ श्री. अतुल गजभिये यांनी केले.

### मतदान जनजागृती शपथ

सरपंच मेळाव्यात स्वीप अंतर्गत मतदार जनजागृती शपथ घेण्यात आली. सर्व सरपंच व पदाधिकारी यांनी तथा नागरीकांनी निष्पक्ष मतदान करावे, तथा इतरांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

दरम्यान मतदान जागृतीसाठी प्रश्नमंजुषा सुद्धा घेण्यात आली. निवडणूक, मतदानाचे नियम, कायदे व कलमांवर विचारलेल्या प्रश्नांना सरपंचांनी चांगलीच दाद दिली. अचूक उत्तर देणार्य सरपंचाना यावेळी थेट पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. सरपंच मेळाव्यात मतदार जनजागृतीचे विविध फलकही लावण्यात आले. विशेष म्हणजे मशेल्फीपाईटने म सर्वांनाच आकर्षित केले. मस्वीपफ्च्या नोडल अधिकारी श्रीमती शिखा पिपलेवार व चमू प्रामुख्याने उपस्थित होते.

### भजेपार ठरली जिल्हास्तरीय 'स्मार्टग्राम'

आर.आर. (आबा) पाटील सुंदर ग्रामपंचायतींचा याप्रसंगी पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. सालेकसा पंचायत समिती अंतर्गत ग्रामपंचायत भजेपारला तालुका व जिल्हास्तरीय स्मार्टग्रामचा प्रथम पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्याचप्रमाणे गोंदिया तालुक्यातील ग्रामपंचायत इर्री, तिरोडा तालुक्यातील ग्रामपंचायत मुंडीकोटा, आमगाव तालुक्यातील ग्रामपंचायत तिगाव, गोरेगाव तालुक्यातील ग्रामपंचायत मोहगाव बु., सडक अर्जुनी तालुक्यातील ग्रामपंचायत डव्वा, अर्जुनी मोरगाव तालुक्यातील ग्रामपंचायत धाबेटेकडी, देवरी तालुक्यातील ग्रामपंचायत मेहताखेडा यांना तालुकास्तरीय प्रथम पुरस्कार प्राप्त झाला. सर्व ग्रामपंचायतींचा शाल, स्मृतीचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देवून गौरव करण्यात आला आहे. जिल्हास्तरीय प्रथम आलेल्या ग्रामपंचायतींला ४० लक्ष तर तालुकास्तरावर प्रथम आलेल्या ग्रामपंचायतींना प्रत्येकी १० लक्ष रूपयांचा पारितोषिक मिळणार आहे.

### तीन ग्रामपंचायतींना माझी वसूंधरा पुरस्कार

माझी वसुंधरा योजनेत गोंदिया तालुक्यातील कारंजा, सडक अर्जुनी तालुक्यातील सौंदड, तिरोडा तालुक्यातील वडेगाव ग्रामपंचातींनी विभागस्तरावर प्रथम पुरस्कार पटकाविला. या तिन्ही ग्रामपंचायतींना स्मृतीचिन्ह देवून गौरविण्यात आले आहे. कारंजा व सौंदड या ग्रामपंचायतींनी ७५ लक्ष रुपयांचा तर वडेगाव ग्रामपंचायतींने ५० लक्ष रुपयांचा पुरस्कार पटकाविला आहे.

### ग्रामपंचायत येगाव जिल्हास्तरावर प्रथम

अर्जुनी मोरगाव तालुक्यातील सिरेगावबांध ग्रामपंचायत संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान अंतर्गत राज्यस्तरावर प्रथम आली. त्यानिमीत्त ग्रामपंचायतींचा स्मृतिचिन्ह देवून विशेष सन्मान करण्यात आला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेअंतर्गत जिल्हास्तरावर अर्जुनी मोरगाव तालुक्यातील येगाव ग्राम पंचायत प्रथम आली. ग्रामपंचायत धादरी व्दितीय तर सालेकसा तालुक्यातील ग्रामपंचायत भजेपार तृतिय पुरस्काराची मानकरी ठरली आहे. विशेष पुरस्कारांतर्गत स्व. वसंतराव नाईक सांडपाणी घनकचरा व्यवस्थापनाचा पुरस्कार मुंडीकोटा ग्रामपंचायत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पाणी गुणवत्ता व पाणी व्यवस्थापन पुरस्कार आमगाव तालुक्यातील तिगाव आणि स्व. आबासाहेब खेडकर शौचालय व्यवस्थापन पुरस्कार सडक अर्जुनी तालुक्यातील कनेरी राम या ग्रामपंचायतीने पटकाविला. सर्व ग्रामपंचायतींचा स्मृतिचिन्ह देवून गौरव करण्यात आला.

### जलजीवन मिशनचे पुरस्कार

जलजीवन मिशन, जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत चित्रकला स्पर्धा प्राथमिक गटात प्रथम जान्हवी किशोर येरपुडे प्रथम, सत्यम बसंत पटले व्दितीय, सानिया लक्ष्मण मडावी तृतिय आले. तर माध्यमिक गटात लिना हरिष ढोमणे प्रथम, वैभव उमेश साखरे व्दितीय, सुमित रोहीणीकुमार बिसेन तृतीय आला. त्यांना अनुक्रमे २१ हजार, ११ हजार आणि ५५०० चा धनादेश, स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र देवून गौरविण्यात आले.

तर वक्तृत्व स्पर्धेत वरिष्ठ महाविद्यालय गटात निखील बन्सोड प्रथम, छाया हेतराम राऊत व्दितीय, वेदांती यादोराव कावळे तृतीय तर कनिष्ठ महाविद्यालय गटात पूज मेश्राम प्रथम, प्रणिता नागदेवे व्दितीय, तुलसी राजकुमार रोकडे तृतीय आली. त्यांना अनुक्रमे २१ हजार, ११ हजार आणि ५५०० रुपयांचे धनादेश, स्मृतीचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देवून गौरविण्यात आले.

# विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन संस्थगित, पुढील अधिवेशन १० जून रोजी

**मुंबई :** विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन आज राष्ट्रगीताने संस्थगित करण्यात आले. पुढील अधिवेशन सोमवार, १० जून २०२४ रोजी विधानभवन, मुंबई येथे होणार असल्याची घोषणा विधानपरिषदेत उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी, तर विधानसभेत अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी केली.



### विधानपरिषदेत प्रत्यक्षात २७ तास ३२ मिनिटे कामकाज

विधानपरिषदेत प्रत्यक्षात २७ तास ३२ मिनिटे कामकाज झाले. रोजचे सरासरी कामकाज ५ तास ३० मिनिटे झाले आहे. या अधिवेशनात सभागृहात सदस्यांची जास्तीत जास्त उपस्थिती ९६.३६ टक्के होती, तर एकूण सरासरी उपस्थिती ही ७७.८२ टक्के इतकी होती.

विधानपरिषदेत १ विधेयके पून:स्थापित करण्यात आले आणि ते संमत करण्यात आले. विधानसभेने संमत केलेली ६ विधेयके विधानपरिषदेत संमत करण्यात आली. तर २ विधेयके शिफारशींशिवाय विधानसभेकडे परत पाठविण्यात आली. सभागृहात नियम ९७ अन्वये एकूण प्राप्त सूचना १ सूचना मान्य करण्यात येऊन त्यावर चर्चा झाली. या अधिवेशनात सहकार्य केल्याबद्दल उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सर्वांचे आभार मानले.

### विधानसभेत प्रत्यक्षात २८ तास ३२ मिनिटे कामकाज

विधानसभेत प्रत्यक्षात २८ तास ३२ मिनिटे कामकाज झाले. रोजचे सरासरी कामकाज ५ तास ४२ मिनिटे झाले. या अधिवेशनात विधानसभेत सदस्यांची जास्तीत जास्त उपस्थिती ९१.४४ टक्के होती, तर एकूण सरासरी उपस्थिती ही ७३.१५ टक्के इतकी होती.

विधानसभेत पुर्न:स्थापित ९ शासकीय विधेयके मांडण्यात आली असून सर्व विधेयके संमत झाली. विधानपरिषदेने संमत केलेले १ विधेयक विधानसभेत संमत करण्यात आले. तसेच सभागृहात नियम २९३ अन्वये एकूण प्राप्त सूचना २ असून दोन्ही सूचना मान्य करण्यात आल्या. मान्य केलेल्या २ सूचनांवर चर्चा झाली.

## महाराष्ट्र राज्य संघाच्या संचालक पदी भाजपचे दिपक कदम विजयी

**गोंदिया:** गोंदिया जिल्हा मजूर संघाचे उपाध्यक्ष दिपक कदम यांची महाराष्ट्र राज्य मजूर सहकारी संघ पुणेच्या संचालक मंडळ निवडणुकीत संचालक पदावर निवड झाली आहे.



कदम हे भाजप सहकार आघाडीचे जिल्हाध्यक्ष आहेत.ते अनेक सहकारी संस्थामध्ये संचालक असून त्यांनी निवडीबद्दल राज्य संघाचे अध्यक्ष संजीव कुसाळकर पुणे, गोंदिया मजूर संघांचे अध्यक्ष सचिन मिश्रा, जिल्हा बँकेचे संचालक राजू एन जैन आणि जिल्ह्यातील मजूर संस्था प्रतिनिधी यांचे आभार दीपक कदम यांनी मानले.

## जिल्हा परिषद शाळांना मिळणार शिक्षक

**गोंदिया :** पवित्र पोर्टल अंतर्गत घेण्यात आलेलया शिक्षक भरतीत जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांसाठी ३२७ शिक्षकांची निवड झाली आहे. या शिक्षकांची यादी शासनाच्या शिक्षण विभागाने २९ फेब्रुवारी रोजी जिल्हा परिषदेकडे पाठविली आहे.४ ते ६ मार्च दरम्यान कागदपत्राच्या पडताळणीनंतर पात्र शिक्षकांना नियुक्ती आदेश देण्यात येईल.जिल्ह्यात १०६९ जिल्हा परिषदेच्या शाळा आहेत. यात शिक्षकांची ८२३ पदे रिक्त असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत होते. दरम्यान काही ठिकाणी शिक्षकांची रिक्त पदे भरण्याच्या मागणीसाठी पालक व विद्यार्थ्यांनी शाळेला कुलूप ठोकून आंदोलन केले. तसेच शिक्षक संघटनांनी शासन व प्रशासनाकडे शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासंदर्भात सातत्याने पाठपुरावा केला. याची दखल घेत शासनाने पवित्र पोर्टलद्वारे शिक्षक भरती केली. या शिक्षक भरतीतून जिल्ह्याला ३२७ शिक्षक मिळणार आहे. यात विषय शिक्षकांची १६८ पदे, पदवीधर शिक्षक १३७ व माध्यमिक शिक्षकांच्या २३ पदांचा समावेश आहे. निवड झालेल्या या शिक्षकांची यादी शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाला पाठविली

# बाजार समित्यांचे कामकाज थांबले

**गोंदिया:** महाराष्ट्र विधानसभेत कृषी उत्पन्न पणन अधिनियम १९६३ मध्ये प्रस्तावित केलेल्या सुधारणेमुळे शेतकरी, व्यापारी, अडते, हमाल, मापारी व इतर संबंधित घटकांवर तसेच बाजार समितीच्या अस्तित्वावर दुष्टपरिणाम होणार आहे. त्यामुळे त्या प्रस्तावित सुधारणा रद्द करण्यात याव्यात, या मागणीसाठी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पदाधिकारी व कर्मचाऱ्यांनी एक दिवसीय लाक्षणिक संप पुकारला. मागणीचे निवेदन पणन संचालक यांना पाठविले.



महाराष्ट्र शासनाने २०१८ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ६४ अन्वये महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन अधिनियम १९६३ मध्ये प्रस्तावित सुधारणा केलेल्या आहेत. या नवीन सुचविलेल्या सुधारणा बदलामुळे लोकशाही मूल्याचे अस्तित्व नष्ट होणार असून, शेतकरी बाजार समित्यांमधील कार्यरत व्यापारी, अडते, हमाल, मापारी व इतर बाजार घटकांवर त्याचा विपरित परिणाम होणार आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने केलेल्या प्रस्तावित सुधारणा रद्द करण्यात याव्यात, जुने विधेयक लागू ठेवावे अशी मागणी करत बाजार समिती सभापती, उपसभापती, संचालक, कर्मचाऱ्यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात तंबू ताणून संप पुकारला. जिल्ह्यातील सर्व बाजार समित्यांचे कामकाज सोमवारी बंद होते.

गोरेगाव: येथे तहसीलदारांना निविदने देवेतेळी बाजार समिती सभापती गिरधारी बघेले, उपसभापती तेजेंद्र हरिणखेडे, संचालक योगराज पारधी, सचिव आशीष बघेले, सहसचिव पी.एम. बोपचे, योगराज पटले, मोहन ठाकरे, नरेंद्र रहांगडाले, राजेश ताराम, रेवेंद्र बिसेन, सेवकराम पटले, कर्मचारी दीपक गायधने, पंकज बिसेन, भिमेश पारधी, सुरेश पटले, अनिल उईके उपस्थित होते.

देवरी: येथे निवेदन देताना सभापती प्रमोद संगीडवार, उपसभापती विजय कश्यप, संचालक अनिल बिसेन, सुकचंद राऊत, बबलू डोये, सचिव लोकेश सोनुने, कर्मचारी मनीष अक्कुलवार, वैशाली साखरे, शिला शिवणकर, राकेश शहारे व विकास देशमुख उपस्थित होते.

# भाविकांच्या सोयीसाठी सुक्ष्म नियोजन करुन जबाबदारीने कामे करा-विजया बनकर

**गोंदिया :** जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव तालुक्यातील मप्रतापगडफ हे हिंदू मुस्लिम एकतेचे प्रतिक असून या ठिकाणी महाशिवरात्री जत्रेकरिता विविध भागातून दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक यात्रेत सहभागी होत असतात.



त्यामुळे यात्रेदरम्यान भाविकांची कोणतीही गैरसोय होणार नाही यादृष्टीने यंत्रणांनी आपसात समन्वय ठेवून जबाबदारीने कामे करावे, असे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी विजया बनकर यांनी संबंधित विभागाला दिले.

महाशिवरात्री निमित्त प्रतापगड येथे यात्रा व्यवस्थापनाचे अनुषंगाने सभा आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी संबंधीत विभागाचा पुर्वतयारी बाबत आढावा घेतांना त्या बोलत होत्या. पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, जि.प. उपाध्यक्ष यशवंत गणवीर, जि.प.चे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. तानाजी लोखंडे, उपविभागीय अधिकारी अर्जुनी/मोरगाव वरूणकुमार शहारे, उपविभागीय पोलीस अधिकारी देवरी विवेक पाटील, तहसिलदार अनिरुद्ध कांबळे व ग्रामपंचायत प्रतापगड सरपंच भोजराम लोगडे मंचावर उपस्थित होते.

निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती बनकर म्हणाल्या, प्रतापगड यात्रेचे आयोजन महाशिवरात्री निमित्त ०७ ते १३ मार्च २०२४ दरम्यान (७ दिवस) करण्यात आलेले आहे. कार्यकारी अभियंता पीडब्ल्युडी क्र.०२ तसेच जि.प. कार्यकारी अभियंता यांनी रस्त्यांची खड्डे बुजविण्याचे काम त्वरित करावे. शाखा अभियंता जि.प. ग्रामीण पाणी पुरवठा यांनी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करुन क्लोरिनेशन करावे. ग्रामसेवकाने विद्युत विभागामार्फत पथदिवे लावण्याचे काम यात्रेपूर्वी पूर्ण करावे. भाविकांच्या आरोग्याच्या दृष्टीने आरोग्य विभागाने पुरेशा औषधांचा साठा उपलब्ध करुन ठेवावा, तसेच आरोग्य पथके स्थापित करण्यात यावी. अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अन्न निरीक्षकाने दुकानातील खाद्य पदार्थांची नियमित तपासणी करावी. कार्यकारी अभियंता सा.बां. विभागाने भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने बॅरिकेटींग त्वरित लावावे. एस.टी. महामंडळाच्या आगार प्रमुखाने पुरेशा बसेसची व्यवस्था करावी. नगरपंचायत मुख्याधिकारी अर्जुनी मोरगाव यांनी अग्नीशमनची व्यवस्था करावी. नगरपंचायत मार्फत साफ-सफाई करण्याकडे विशेष लक्ष्य द्यावे. सर्व यंत्रणांनी एकमेकांच्या समन्वयातून आपआपली जबाबदारी चोखपणे पार पाडावी. यात्रे दरम्यान योग्य ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचे नियोजन करावे, असे निर्देश विजया बनकर यांनी संबंधित यंत्रणांना दिले.

पोलीस अधीक्षक श्री. पिंगळे म्हणाले, यात्रेदरम्यान कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने पोलीस बंदोबस्त चोख ठेवण्यात यावा. यात्रे दरम्यान अवैध मद्यविक्री व इतर असामाजिक तत्त्वांवर आळा घालण्यासाठी पथकांची नियुक्ती करावी. जवळपास ५०० ते ६०० वाहने ठेवण्याची पार्कींग व्यवस्था, वाहतूक व्यवस्थेचे नियोजन करुन संपूर्ण यात्रा शांततेत पार पाडण्याकरीता एकजुटीने कार्य करावे, असे निर्देश पोलीस अधीक्षक यांनी यावेळी दिले.

सभेला जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन कापसे, कार्यकारी अभियंता बाघ इटियाडोह राज कुरेकार, जिल्हा अग्निशमन अधिकारी निरज काळे, पोलीस निरीक्षक केशोरी प्रताप भोसले व विविध विभागाचे कार्यालय प्रमुख व गांवकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बाहेरचा व रिपीट उमेदवार नको,पण स्थानिकच हवा






## निरीक्षकासमोरभाजप पदाधिकाऱ्यांचा सुर

**गोंदिया :** येत्या काही दिवसातच लोकसभा निवडणुकीचे पडघम वाजणार असून भारतीय जनता पक्षाने उमेदवारांच्या बाबतीत चर्चा करण्याकरीता निरीक्षक नेमले होते. या निवडणुकीत भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघात स्थानिकच उमेदवार हवा. भंडारा-गोंदिया जिल्ह्याबाहेरचा नको असा सुर ७० टक्के उपस्थितांनी व्यक्त केल्याची चर्चा समोर आल्याने निरीक्षकांसमोर पेच निर्माण झाल्याचे बोलले जात आहे.

निरीक्षकांकडे मात्र गेलेल्या नावामध्ये विद्यमान खासदार सुनिल मेंढे, माजी आमदार डॉ.परिणय फुके, माजी आमदार हेमंत पटले, माजी.जि.प.अध्यक्ष व भंडारा-गोंदिया लोकसभा निवडणुक प्रमुख विजय शिवणकर, ब्रम्हानंद कुरंजेकर, प्रशांत कटरे, इंजि.राजेंद्र पटले यांचा नावाचा समावेश असल्याचे सुत्रांनी सांगितले. त्यासोबतच महिला पदाधिकाऱ्यांनी पुरुषच उमेदवार का, महिलांना संधी का नाही? अशी भूमिका सुद्धा मांडल्याची माहिती समोर आली आहे.वेळप्रसंगी महिलांना उमेदवारी देण्याची भाजपवर वेळ आलीच तर यांच्याकडे माजी जि.प.उपाध्यक्ष रचना गहाणे,डॉ.विजया नंदुरकर, जि.प.सदस्य एड.माधुरी रहागंडाले,माजी सदस्य सीताबाई रहांगडाले,कल्याणी भुरे,इंद्रायणी कापगते सारख्या मातब्बर महिलांची फळी सुध्दा तयार आहे.

भंडारा-गोंदिया व गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदारसंघात गोंदिया जिल्ह्याचा भाग येत असल्याने जिल्ह्यातील लोकांची उमेदवार कोण यावर चर्चा सुरु असते. त्यातच गुरुवारी (२९ फेब्रुवारी) भंडारा जिल्ह्यातील साकोली येथील होटल तुली येथे भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघात भाजपचा उमेदवार कोण असावा, याची चाचपणी करण्यासाठी भाजपचे लोकसभा निरीक्षक पोचले होते. यामध्ये महाराष्ट्र प्रदेश महिला भाजप प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ आणि आमदार प्रवीण दटके यांचा समावेश होता.

या दोन्ही निरीक्षकांनी गुरुवारी (२९ फेब्रुवारी) लोकसभा मतदारसंघातील भाजपच्या उमेदवारीसंदर्भात दोन्ही जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष, उपाध्यक्ष, जिल्हा सचिव, तालुका अध्यक्ष, जिल्हा आघाडीचे अध्यक्ष, आजी माजी आमदार खासदार, माजी जि.प.अध्यक्ष यांच्यासह दोन्ही जिल्ह्यातील कोअर कमिटी पदाधिकाऱ्यांची मते जाणून घेतली. त्यात दिवसभरात भाजपचे प्रमुख पदाधिकारी, तसेच वेगवेगळ्या मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांची मते जाणून घेण्यात आली. त्यानुसार हे निरीक्षक आपला गोपनीय अहवाल प्रदेश भाजपला सादर करणार आहेत. सुमारे ६० पदाधिकारी या बैठकीला उपस्थित होते, त्यापैकी ४० च्यावर उपस्थितांनी भंडारा-गोंदिया लोकसभा निवडणूकीसाठी भाजपचा उमेदवार बाहेरचे पार्सल नको, पण उमेदवार रिपिट पण करु नये अशी भूमिका दोन्ही जिल्ह्यातील भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी मांडल्याचे सुत्रांनी सांगितले.

भंडारा- गोंदियात मागील लोकसभा निवडणुकीत भाजपने आरएसएसचा कार्यकर्ता असलेल्या नवख्या उमेदवाराला तिकिट देत मोदी लाटेत गड सर केला. सन २०२४ च्या लोकसभा निवडणूकीसाठी भाजपमधून लढण्यासाठी इच्छुकांची मोठी संख्या आहे. त्यामुळे पक्षाची ही एक प्रक्रिया असली, तरी अंतिम निर्णय दिल्लीतच होणार असल्याने भंडारा-गोंदियाची भाजपच्या तिकिटाची लॉटरी नेमकी कोणाला लागणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

२०१६ पुर्वी भाजप मध्ये नेते लहान व संघटना मोठी होती, आता या उलट नेते मोठे व संघटना लहान झाल्याची खंत भाजपच्या जुन्या नेतेमंडळींकडून व्यक्त केली जात असून बाहेरचा उमेदवार जिल्ह्यावर लादू नये असेही अप्रत्यक्षपणे निरीक्षकांना भाजपमधील पदाधिकाऱ्यांनी सांगितले. पाच वर्षातील विद्यमान खासदार यांच्या कार्यप्रणालीवर व माजी राज्यमंत्र्यांनी आपल्या कार्यकाळात दोन्ही जिल्ह्यात वाढीस घातलेल्या गटातटाच्या राजकारणामुळे प्रत्येक गटाकडून एकमेकांना शह देण्याचा प्रयत्नही केला गेला यात शंका नाहीच.

भंडारा गोंदिया मतदारसंघात एकूण १८ लाख १६ हजार ६०७ मतदारांची संख्या असून जातीय आधारावर विभागणी केली तर सध्या भंडारा गोंदियात चार लाख कुणबी मतदार, तीन ते साडे तीन लाख पोवार मतदार, तीन लाखाच्या घरात तेली मतदार तर दीड ते २ लाख कलार समाजातील मतदार असल्याची आकडेवारी त्या समाजातील नेत्याकंडून सांगितले जाते.

विदर्भातील लोकसभा जागांचे वाटप करतांना सर्वच पक्ष जातीय समीकरणाला महत्व देतात. विदर्भातील वर्धा लोकसभा मतदारसंघात भाजपने तेली समाजाचा उमेदवार दिल्यास,भंडारा गोंदिया लोकसभा मतदारसंघात हमखास कुणबी समाजाचा उमेदवार दिला जातो.तर चंद्रपूर व नागपूर मतदारंघांना खुले ठेवले जाते.भाजपने जातीय राजकारणात समतोल राखण्याकरीता चंदूपर कुणबी,वर्धा तेली व भंडारा गोंदियात पोवार समाजाला उमेदवारी दिली तर या तिन्ही मोठ्या संख्येने असलेल्या जातिंना संधी मिळू शकते. मात्र गोंदिया भंडारा मतदारसंघाची जेव्हा बाजू येते तेव्हा याठिकाणी वेगळेच समीकरण तयार होतात.गेल्या विधानसभा निवडणुकीत तेली समाज नाराज झाल्याने भाजपला याचा फटकाही बसलेला आहे.

त्यामुळे यावेळी भाजप काय भूमिका घेते याकडे लक्ष लागले असून तेली समाजाने तर आक्रमक भुमिका घेतली आहे त्यामुळे पक्षाने जो उमेदवार दिला त्याच्या पाठीशी उभे राहायचे की, समाज म्हणेल तो उमेदवार निवडून द्यायचा? हा एक मोठा प्रश्न तेली समाजापुढे उभा राहिला आहे.यात माजी आमदार चरण वाघमारे यांचीही महत्वाची भूमिका राहणार असून ते नेहमीच बाहेरच्या उमेदवाराच्या विरोधात असल्याचे बघावयास मिळाले आहे.